शुक्रवार, २७ जानेवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१५७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●FRIDAY 27 JANUARY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-157 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

# विठ्ठल-रुक्मिणीमातेचा शाही विवाह

## भक्ताने केले दोन कोटीचे दागिने दान

## नाव गुप्त ठेवण्याची घातली अट

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर : वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर विठ्ठल व रूक्मिणीमातेच्या शाही विवाह गुरुवारी संपन्न झाला. या सोहळ्यासाठी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर फुलांनी सजविण्यात आले होते. तसेच विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्यासाठी एका भक्ताने दोन कोटीचे दागिने दान केले.**

पंढरपूरच्या विठुरायाच्या आणि रुक्मिणीच्या चरणी आजवरचे सर्वात मोठे दान अर्पण करण्यात आले आहे. जालण्यातील एका महिला भाविकाने विठ्ठल रुक्मिणीचरणी हे दान अर्पण केले आहे. यामध्ये जवळपास पावणे दोन कोटी रुपयांच्या सोने-चांदीच्या दागिन्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या भाविकाने आपले नाव गुप्त ठेवण्याची अट घातली आहे.

जालन्यातील या भाविकाने गुप्त दान म्हणून विठ्ठल-रुक्मिणीसाठी सोन्याचे मुकुट, सोन्याचे विविध अलंकार, सोन्याच्या पाटल्या, मनी मंगळसूत्र आदी सोन्याचे दागिने अर्पण केले आहेत. वसंतपंचमीच्या मुहूर्तावर विठ्ठल आणि रूक्मिणीचा विवाह सोहळा संपन्न झाला. यानिमित्त या भाविकाने रुखवत म्हणून चांदीचे ताट, वाट्या, तांब्या, आरसा, समय असा विविध वस्तूसह रेशमी वस्त्रेही भेट दिली आहेत. मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी याबाबत माहिती दिली आहे.



# अस्सल शिवसैनिक माझ्यासोबत : उद्धव ठाकरे



आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** अन्यायावर लाथ मारा हे शिवसेनेचे ब्रीदवाक्य आहेच. ८० टक्के समाजसेवा आणि २० टक्के राजकारण हे आपले ब्रीद आहेच. आपल्याला बाळासाहेब ठाकरेंनी हीच शिकवण दिली आहे. ही शिकवण मानणारे अस्सल आणि कट्टर शिवसैनिक माझ्यासोबत ठामपणे उभे आहेत. विकाऊ होते ते विकले गेले. काय भाव ते तुम्हाला माहित आहे, असे उद्धव ठाकरे यांनी ठाण्यात म्हणताच उपस्थितांनी ५० खोके एकदम ओके या घोषणा दिल्या. त्यानंतर ही घोषणा राहुल गांधींपर्यंत जम्मूलाही पोहचली आहे, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे ठाण्यात आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात उद्धव ठाकरे उपस्थित होते. त्यावेळी भाषणात त्यांनी एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेल्या गटावर टीका केली.

उद्धव ठाकरे म्हणाले, जे अस्सल शिवसैनिक निखाऱ्यासारखे माझ्यासोबत राहिले आहेत. हे निखारेच उद्या राजकारणात मशाल पेटवणार आहेत, असे म्हणत ठाण्यात उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेल्या सगळ्यांना टोला लगावला आहे. तसेच महाराष्ट्रात जे काही घडले त्यामुळे महाराष्ट्राची बदनामी झाली असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. एवढेच नाही तर मी लवकरच ठाण्यात सभा घेणार आहे असेही उद्धव ठाकरेंनी जाहीर केले आहे.

उद्धव ठाकरे यांनी ठाण्यातल्या टेंभी नाका भागात जाऊन आनंद दिघे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला आहे. ही घटना महत्त्वाची मानली जाते आहे. आनंद आश्रम या ठिकाणी ते गेलेले नाहीत. आनंद दिघे यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरु मानतात. अशात याच ठाण्यात जाऊन उद्ध ठाकरेंनी आनंद दिघे यांच्या पुतळ्याला अभिवादन केले आणि हार घातला. आज उद्धव ठाकरेंच्या सोबत राजन विचारे तर होतेच पण राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाडही होते.

# व्यावसायिकावर गोळ्या झाडणारा शार्पशूटर ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांच्या हत्या प्रकरणात तपास यंत्रणेला महत्त्वाचे यश मिळाले असून बियाणी यांच्यावर गोळीबार करणाऱ्या शूटरला ताब्यात घेण्यात आलं आहे. ५ एप्रिल २०२२ रोजी संजय बियाणी यांची घरासमोर गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. या हत्येचा मास्टरमाइंड दहशतवादी हरविंदरसिंह रिंदा हा असून त्याच्या दोन शार्पशूटरने बियाणी यांच्यावर गोळीबार केला होता. त्यातील फरार असलेला दुसरा मुख्य शूटर दीपक सुरेश रांगा याला राष्ट्रीय तपास यंत्रणेने नेपाळ बॉर्डरवर पकडले आहे. या शूटरच्या शोधासाठी नांदेड पोलिसांची पथके अनेक राज्यांत जाऊन आली होती. आता शूटरच्या अटकेमुळे बियाणी यांच्या हत्येसह इतर घटनांतील अनेक बाबी समोर येणार आहेत. बियाणी यांची खंडणीच्या कारणावरून हरविंदरसिंह रिंदा याच्या साथीदाराने गोळ्या घालून हत्या केली होती. त्यामुळे राज्यभरात खळबळ उडाली होती. तत्कालीन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी बियाणींच्या घरी भेट देऊन आरोपीला अटक करण्याचे आश्वासन दिले होते.

# महाराष्ट्रात २९ जानेवारीनंतर थंडीची लाट ?

## हवामान विभागाचा अंदाज : तापमानातील चढ-उतारामुळे आजारांचे प्रमाण वाढले

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : 29 जानेवारीनंतर महाराष्ट्रात थंडीचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. सध्या संपूर्ण राज्यात पुन्हा थंडीचा कडाका जाणवत आहे. अशातच आता 29 जानेवारीनंतर महाराष्ट्रात थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. 2 फेब्रुवारीपर्यंत ही थंडीची लाट कायम राहिल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.


हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मध्य महाराष्ट्रात थंडीच्या लाटेसारखी परिस्थिती असणार आहे. तर मुंबईत किमान तापमान सरासरीपेक्षा कमी होऊ शकते असे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. पुढील काही दिवस ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने किमान तापमानात किरकोळ वाढ होईल. परंतु दिवसाच्या तापमानात अंशतः घट होण्याची शक्यता आहे. 20 जानेवारीनंतर मात्र, थंडीचा जोर अधिक वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. राज्यात थंडीचा जोर कायम आहे. मात्र, काही भागात किंचित थंडी कमी झाली आहे. त्यामुळं काही भागात नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तर काही भागात अद्यापही हुडहुडी कायम आहे. आजपर्यंत म्हणजे 26 जानेवारीपर्यंत थंडी वाढणार नसल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला होता. राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि उत्तर भारतात थंडी अद्यापही कायम आहे. राज्यातील इतर भागात थंडीचा जोर काहीसा कमी झाला आहे. त्यामुळे नागरिकांना थंडीपासून काहीसा दिलासा मिळाला आहे. ज्या ठिकाणी थंडीचा जोर कायम आहे, त्या ठिकाणी शेकोट्या पेटल्या आहेत. दरम्यान, तापमानातील चढ-उतारामुळे आजारांचे प्रमाण वाढले आहे.




### कांदा पिकावर करपा रोग

एकीकडे राज्यात तापमानात वाढ होत असताना नागरिकांना दिलासा मिळत आहे . मात्र दुसरीकडे उत्तर महाराष्ट्रात अजूनही थंडीचा कडाका कायम आहे . तापमानाचा पारा घसरल्याने त्याचा परिणाम रब्बी हंगामाच्या पिकांवर होत आहे . बहुतांश भागात कांदा पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढला असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे . तसेच गहू, हरभरा, मका या पिकांना देखील या वातावरणाचा फटका बसणार असून उत्पादनात घट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे .

# परिस्थितीच अशी आहे





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932



आधुनिक केसरी

परिस्थितीच अशी आहे, कविता म्हणावी की न म्हणावी
घडी अशी आहे की गाणी गावी किंवा न गावी माणुसकीच्या
सरोवरातले प्रेमजल आता आटत चालले आहे प्रेमजलावर
फुलणारी कमळे आता खुरटताना दिसत आहेत स्वार्थाच्या
तुफानात आशेचा नंदादीप फडफडतो आहे घडी अशी आहे
की आस तरी कोणाची धरावी ।। १ ।।
काल परवाच थोडा थोडा पाऊस पडला होता
आशेचा डोंगर हिरव्या रंगाने खुलला होता
काळ्या निळ्या डोहाच्या तळाशी अपार माया होती
प्रेमाच्या स्पर्शाने पुलकित झालेली काया होती
कुठून तरी हवेपणाचे दाहक ऊन पडले
हिरवे झालेले डोंगर पुन्हा बोडके दिसू लागले
तळ्यातले प्रेम, माया सुकून गेली
सगळेच झाले कोरडे तर आशा तरी कोणाची धरायची ।।
२ ।।
पण गाणे तर गायचेच आहे, कविता तर म्हणायचीच आहे
तुफानात फडफडणाऱ्या नंदादीपाला तेवत ठेवायचे आहे
वातीच्या अवतीभवती निर्धाराची काच संरक्षण म्हणून
ठेवायची आहे ज्योत आता तेवत राहील, तुफानाची भीती
नाही उघड्या बोडक्या डोंगरावर पुन्हा प्रेमजलाचा वर्षाव
करायचा आहे कोरडे झालेले तळेही काठोकाठ भरून
टाकायचे आहे.
प्रेमासाठी तहानलेल्या जीवांना अपार माया, प्रेम द्यायचे आहे
माणुसकीच्या सरोवरातील सुकलेली कमळे मग आपोआप
फुलू लागतील कविता होऊन शब्द ओठांवर पिंगा घालू
लागतील कवितेचे होईल मग सुरेख असे गाणे काही झाले
तरी आता मागे फिरायचे नाही म्हणून म्हणतो आता कविता
तर म्हणायचीच आहे, गाणे सुद्धा गायचेच आहे. ।। ३ ।।



## आनंदी पहाट

# व्यक्तिमत्वाचा संबंध मानसिकतेशी निगडीत

आधुनिक केसरी

अंतरात्म्याला शांती मिळणं अत्यंत जरुरीचं असतं. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरं तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्याव्यतिरिक्त आणखीन एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणं मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनांतील सार कशांत आहे ? हे आपण स्वतःच शोधून काढायचं असतं. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. मिळेल त्यांत समाधानी राहावं असं म्हंटलं जातं, पटतं का आपल्याला ? खरंच जे काही मिळतं त्यांत आपण खरंच समाधानी राहू शकतो का ? समाधानाचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी असतो. त्यामुळे आपल्या अंतर्मनाला जोपर्यंत समाधान मिळत नाही, तो पर्यंत आपण मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळवू शकत नसतो. आपण करत असलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला नेहमीच समाधान मिळवून देतातच असं नाही. आपण करत असलेल्या गोष्टींमध्येच आपण समाधान शोधत असतो. परंतू ज्या गोष्टी आपल्याला समाधान देतील त्यांची आपण निवड करतो का ? प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपलं व्यक्तिमत्व बाहय तसेच अंतर्गत कसं असू शकेल, हे ठरतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**मोक्षाचे आंदन | लाभो देवा ||**
रोज दारी काऊ | कोकावा मंजुळ ||
धान्याची ओंजळ | भरलेली ||६||
राबता असावा | संत सज्जनांचा ||
सन्मान तयांचा | घडो नित्य ||७||
आनंदाची लाट | आनंदें उसळे ||
अन्नपूर्णा मिळे | समाधान ||८||
पुनवेचा चंद्र | रमावा दारात ||
चांदणे मनात | पाझरावे ||९||
देह आत्मा शुद्ध | तेच निरंजन ||
मोक्षाचे आंदन | लाभो देवा ||१०||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**समाजात सहकार्य करणाऱ्या अनेक लोकांना एक वाईट सवय असते की, आपल्याविना कोणाचे काही अडते याचे त्यांना सुख वाटते.**

**तुम्ही एखाद्याला सहकार्य न करून तुमची ताकद सिद्ध करण्यापेक्षा सहकार्य करून ताकद सिद्ध करण्याचा प्रयत्न कराल तर तुमची ताकद वाढू शकते.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

आधुनिक केसरी

**ज्योति पुञ्ज परकाश है, एक अंग मह जाहि । अणू तेज में तेज सब, रबि शशि अग्निहिं ताहि ।।७३।। (स्ववेंद पंचम मण्डल अष्टम अध्याय) ०५/०८/७३**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** तो परमेश्वर सर्व ज्योतींचा प्रकाशांचा पुंज आहे. त्याच्या एक अंगच्या प्रकाशाने अखिल विश्वाचा प्रकाश प्रकाशत आहे. त्याच्या अणू मात्र तेजात सर्व सूर्य, चंद्र तसेच अग्निचं तेज, प्रकाश प्रकाशीत होत आहे.



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

आपल्याला प्रपंच तर करायचा आहे आणि परमार्थ ही करायचा आहे तर मित्रांनो सगळ्या संतांनी आपल्याला त्यासाठी ज्ञानमार्गाची निवड करायला सांगितली आहे. ज्ञानाने ध्येय साध्य होते आणि संतांचे विचार हे आपण जीवनरूपी नौका पार पाडण्यासाठी साधन म्हणून वापर करावा. समर्थाच्या "दासबोध"अभ्यास विषयात आपण साधनप्रतिष्ठा निरूपणाद्वारे जीवनमार्ग सोपा होण्यासाठी माणसाने कसं असावे हे या सातव्या दशकातील सातव्या समासात आत्मसात करूया. प्रपंचात काय किंवा परमार्थात काय ध्येय साध्य होण्यासाठी तुमच्या जवळ निर्मळ मन असणे गरजेचे आहे. पण प्रपंचातील ज्ञान व परमार्थातील ज्ञान यांच्या मध्ये मूलतः भेद आहे. प्रापंचिक ज्ञान व पारमार्थिक ज्ञान हे ज्ञानी पुरूष( याठिकाणी समस्त मानव जात )ही संकल्पना वाचकांनी लक्षात घ्यावी. ज्ञानाशी एकरूप झाल्यावर एकत्र येतात. या ज्ञानाचे स्वरूप, क्षेत्र,क्षेत्रफळ वेगवेगळे आहेत पण ज्यावेळी आपण नित्याच्या सवयीनें प्रापंचिक ज्ञान व परमार्थात वापरण्याचा प्रयत्न करतो,त्यावेळी विपरीत ज्ञान उत्पन्न होते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भगवंताची कृपा

आधुनिक केसरी

खरोखर, भगवंताच्या कृपेशिवाय बाकी गोष्टी असून वा नसून सारख्याच आहेत. एखादी मुलगी लग्न होऊन सासरी गेली; तिथे सासू, सासरा, दीर नणंद, जावा वगैरे सर्व लोकांशी तिचे चांगले आहे पण नवर्याशी मात्र पटत नाही, तर तिला खरे सुख समाधान मिळणार नाही. परंतु, समजा, नवर्याशी चांगले आहे पण इतरांशी तितकेसे ठीक नाही, तर तिचे अडणार नाही. तसेच एकाद्याच्या आजारात पैसा, डॉक्टर, औषधे, माणसांची मदत वगैरे सर्व गोष्टी अनुकूल आहेत, पण त्यात भगवंताच्या कृपेचा हात नसेल तर सर्व व्यर्थ आहे. याच्या उलट, भगवंताची कृपा आहे, पण इतर गोष्टींचा अभाव आहे, तरी काम भागते. म्हणून सर्व बाबतीत भगवंताच्या कृपेची गरज आहे; आणि ती मिळविण्याकरिता, त्याचे स्मरण हाच एक मार्ग आहे. समजा, एखादी कुरूप मुलगी आहे. पुष्कळ ठिकाणी तिला दाखविली पण ती नापसंत झाली; नंतर एकाने तिला पाहिली आणि एकदम पसंत आहे म्हणून सांगितले. ती पसंत झाली की सौभाग्याचे सर्व गुण जसे तिच्यामध्ये येतात, त्याप्रमाणे ज्याच्यावर भगवंताची कृपा झाली त्याचे काम पूर्ण झाले; मग त्याने किती पाप आणि पुण्य केले आहे हे कोण पाहतो ! भगवंताची कृपा सर्वांवर, अर्थात् आपल्यावरही आहेच. आपल्यावर कृपा आहे अशी आपली खात्री झाली की ती प्रकट होते. कृपा म्हणजे भगवंताशी एकरूपताच. '



मी पिईन तर आईचेच दूध पिईन ' असे म्हणून वासरू गाईला ढुसण्या मारते आणि गाय त्याला पाजते; त्याप्रमाणे आपण भगवंताशी अनन्यतेने वागले आणि त्याचे नामच मागितले तर तो कृपा करतोच करतो. आपल्याला हव्या त्या गोष्टी देण्यामध्ये भगवंताची खरी कृपा नसून, असेल त्या परिस्थितीमध्ये आपले समाधान टिकणे ही त्याची खरी कृपा होय. 'भगवंता ! तू माझ्यावर कृपा कर,' असे सांगणे म्हणजे 'मी कृपेला लायक नाही त्या माझ्यावर तू कृपा कर' असे म्हणण्यासारखेच आहे. जो लायक नाही त्याच्यावर कृपा कशी होईल ? ज्याप्रमाणे डोंगरावर आपण शब्द काढला तर त्याला उत्तर म्हणून आपलाच शब्द प्रतिध्वनिरूपाने येतो, त्याप्रमाणे भगवंताच्या प्रार्थनेचा प्रतिध्वनी त्याच्या कृपारूपाने येतो. भगवंताच्या कृपेनेच त्याचे नाम आपल्या मुखात येते. भगवंताची कृपा आपल्यावर आहेच असे म्हणावे. ती काम करीत असतेच, आपणच आपल्या शंकेने ती झाकून टाकू नये. पुष्कळ केलेले देखील शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरले की आपली वृत्ती निःशंक होते. जे भगवंताचे आहेत ते अहेतुक नाम घेतात. **आजचे बोधवचन आहे - कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात आणि वाटेल त्या अवस्थेत घेण्यासारखे एक भगवंताचे नामच तेवढे आहे.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥
रात्रंदिस मज पाहिजे जवळी । क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥२॥
नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रातलें अनंता तुका म्हणे ॥३॥
हाचि नेम आतां न फिरें माघारी । बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥१॥
घररिघी जालें पट्टराणी बळें । वरिलें सांवळें परब्रम्ह ॥२॥
बळियाचा अंगसंग जाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे ॥३॥
नाहीं काम माझें काज तुम्हांसवें । होतें गुप्त ठावें केलें आतां ॥१॥
व्यभिचार माझा पडिला ठाउका । न सर ती लोकांमाजी जालें ॥२॥

# स्वातंत्र्य, समता, बंधुता मूल्ये जपत लोकशाहीला बळकट करुया

## पालकमंत्री संदिपान भुमरे : मुख्य शासकीय ध्वजारोहण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आपल्या संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये लक्षात ठेऊन लोकशाही बळकट करत तिला अबाधित ठेवण्याचा प्रयत्न भारतीय नागरिक म्हणून प्रत्येकाने करण्याचे आवाहन पालकमंत्री तथा रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी केले.

भारतीय प्रजासत्ताक  दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते झाले.  हा समारंभ पोलीस आयुक्त कार्यालयाच्या 'देवगिरी' मैदानावर संपन्न झाला.

यावेळी खासदार इम्तीयाज जलील, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार संजय शिरसाठ, प्रदीप जैस्वाल, माजी खासदार चंदकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले,विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर,पोलीस आयुक्त डॉ.निखिल गुप्ता, जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पाण्डेय, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, विक्रीकर सहआयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्यासह सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते. पालकमंत्री आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले की, आपला भारत हे एक मोठे लोकशाही राष्ट्र आहे. म्हणजे हे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य आहे. ज्या देशाची सर्व सत्ता प्रजेच्या हाती असते, तो देश म्हणजे प्रजासत्ताक होय. हा अधिकार भारताच्या घटनेनुसार 26 जानेवारी 1950 साली मिळाला. त्या दिवसापासून आपल्या देशात प्रजेची सत्ता सुरु झाली.

भारतात जनहितकारी, कल्याणकारी व धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था राबविली जाईल असेही अभिवचन संविधानात देण्यात आले आहे. जगातील सर्वात मोठा सार्वभौम लोकशाही देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सर्व नागरिकांना आवाहन आवाहन आहे की, जात, धर्म, वंश, लिंग हे सर्व भेदभाव विसरुन एक समानतेने सर्वांना समान संधी मिळवून देण्यासाठी अग्रेसर



राहावे. तुम्ही-आम्ही आपण सर्वजण मिळून प्रयत्न केल्यास सामाजिक जीवनमान उंचावण्याबरोबरच आपल्या देशाला सामर्थ्यशाली महासत्ता बनवू शकतो. याची मला खात्री आहे. असे पालकमंत्री भुमरे यांनी शुभेच्छा संदेशात सांगितले.

या कार्यक्रमात राष्ट्रपती पदक प्राप्त पोलीस अधिकारी यांना पालकमंत्री भुमरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यामध्ये श्रीमती महक स्वामी सहायक पोलीस अधीक्षक वैजापूर ग्रामीण यांना परेड संचालनालात कमांडर म्हणून गौरविण्यात आले. तसेच शिलवंत रघुनाथ नांदेडकर पोलीस उपायुक्त शहर परिमंडळ यांना विशेष सेवा पदक, जयदत्त बबन भवर औरंगाबाद ग्रामीण यांना गडचिरोली जिल्ह्यात विशेष कामगिरी बद्दल सेवा पदक, पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले व गणेश माने यांना विशेष सेवा पदक तसेच रमेश काथार, बिनतारी संदेश विभाग यांना उत्कृष्ट सेवा प्रेसिडेंट पोलीस पथक, श्रीमती प्रविणा ताराचंद्र यादव, पोलीस स्टेशन सायबर औरंगाबाद शहर, प्रभारी अधिकारी पोलीस प्रशिक्षण केंद्र आंतरवर्ग उप-प्राचार्य प्रशासन म्हणून उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांना युनिट होम मिनिस्टर मेडल, गोकुळ पुंजाजी वाघ सहायक फौजदार आर्थिक गुन्हे शाखा औरंगाबाद शहर उत्कृष्ट सेवा प्रेसिडेंट पोलीस पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात पोलीस दल, अग्नीशमन दल, श्वान पथक, वरुन वाहन अतिशिघ्र प्रतिसाद पथक दंगा विरोधी पथक यांच्यासह विविध पोलीस पथकांनी मान्यवरांना मानवंदना दिली. ध्वजारोहणानंतर पालकमंत्री यांनी स्वातंत्र्यसैनिक यांची भेट घेत नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# सिडको पोलिसांची बोगसगिरी

## १२२ क्र. व्हॅनवरील कर्मचारी पीएसआय असल्याची बतावणी करत पादचाऱ्यांना दाखवतात दंडुके

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद : मध्यरात्री १२.३० वसंतराव नाईक महाविद्यालयासमोर उभ्या असणाऱ्या पादचाऱ्यांना सिडको पोलिस ठाण्याची ११२ व्हॅन मधील कर्मचारी दंडुके दाखवत दमदाट्या करतात. या प्रकाराची पोलिस उपायुक्त शिलवंत नांदेडकर यांनी दखल घेतली आहे.**

साबळे आणि जाधव अशी त्या कर्मचाऱ्यांची नावे असल्याचे पोलिस ठाण्यातून कळाले. आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यानंतर ११२ क्र.व्हॅन चे पोलिस घटनास्थळी धावून अडचणीत सापडलेल्या नागरिकांना सोडवण्या ऐवजी काहीच काम नसल्यासारखे  वागतात. याची खंत वरिष्ठ पोलिस अधिकारी व्यक्त करतात.

एक पत्रकार मध्यरात्री घरी पायी परतत असतांना वसंतराव नाईक महाविद्यालयासमोर लघुशंकेसाठी थांबला. त्या ठिकाणी उंच झाडीही आहे.व पाऊसही रिमझिम सुरु होता. मोबाईल स्क्रीनवर पावसाचे थेंब पडू नयेत म्हणून झाडाच्या



अलीकडे पत्रकार उभा असतांना सिडको पोलिसांची ११२क्र व्हॅन तेथे आली काय करता.मागून लेडीज येताहेत मी पीएसआय सपकाळ अशी दमदाटी केली.  पत्रकाराने माफी मागत प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला.पण बोगस सपकाळ व त्याचा जोडीदार जाधव ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.गुन्हेशाखा असो की आमचे वरिष्ठ असो सगळे असे तसेच आहेत.अशी भाषा सुरु केल्यावर  त्यातील कर्मचारी कोणत्या पोलिस ठाण्याचे आहेत, याची माहिती पत्रकाराने घेतली.

सिडको पोलिस ठाण्यात पीएसआय सपकाळ कोणीही नाही हे पत्रकाराला माहित होते.  तरीही त्याने सिडको पोलिस ठाण्यात फोन लावत खात्री करुन घेतली. ११२क्र व्हॅन मधील कर्मचारी नागरिकांशीच भामटेपणा करतात. हे लक्षात आल्यावर  हा प्रकार पोलिस उपायुक्त शिलवंत नांदेडकर यांच्या कानावर घातला. त्यांनी आपण या प्रकरणाची दखल घेऊ असे सांगितले.

# श्याम मानव यांना धमकी; हिंजवडीत गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांना आलेल्या धमकीप्रकरणी पुण्याच्या हिंजवडीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्याम मानव यांच्या मुलाच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.  पोलिसांकडून अज्ञात आरोपींचा शोध सुरु आहे.

श्याम मानव यांचा मुलगा क्षितिज यामिनी शाम यांनी या प्रकरणी फिर्याद दिलेली आहे. 21 आणि 22 जानेवारीला व्हॉटसअॅपवर असे धमकीचे मेसेज आलेले आहेत. श्याम मानव यांच्या युट्युब चॅनेलच्या मॅनेजमेंटचं काम क्षितिज पाहतात, म्हणून त्यांचा मोबाईल नंबर तिथे देण्यात आलेला आहे. त्याच नंबरच्या व्हॉटसअॅपवर शिवीगाळ करत घरावर बॉम्ब फेकण्याची आणि बंदुकीतून गोळ्या घालण्याची धमकी आलेली आहे. क्षितिज पुण्यातील बावधन परिसरात राहायला आहेत आणि धमकीचे मेसेज आले तेव्हा  ते घरीच होते. त्या अज्ञातांचा शोध घेणं सुरू आहे. अज्ञात व्यक्तीने क्षितिज यांच्या फोनवर फोन करुन शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांना धमकावण्याचा देखील प्रयत्न केला. जान से मार दुंगा म्हणत त्यांना मेसेज केले. त्यानंतर क्षितीज यांना काही घाणेरड्या भाषेतले मेसेज केले. त्यानंतर क्षितीज यांनी ते मेसेज थेट अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या व्हॉट्सअप ग्रुपवर पाठवले. श्याम मानव यांनी पोलिसांत तक्रार दाखल करण्यासाठी सांगितले, असे तक्रारीत नमूद केले आहे.

# गौतम बुद्धांचा अस्थिकलश घेऊन निघालेली पदयात्रा सोमवारी वैजापुरात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तथागत गौतम बुद्धांचा पवित्र अस्थिकलश घेऊन निघालेली थायलंड येथील आंतरराष्ट्रीय भिक्खू संघ व उपासकांची पदयात्रा 30 जानेवारी रोजी दुपारी 4 वाजता वैजापूरात पोहोचणार असून शहरात ठिकठिकाणी 'या पदयात्रेचे स्वागत व अस्थिकलशाचे दर्शन घेण्यासाठी स्थानिक उपासक, उपासिकांनी जय्यत तयारी सुरु केली आहे.शहरातील जिल्हा परिषद मुलांची शाळा येथे भिक्खू संघ व उपासक मुक्कामी राहणार आहे. तसेच रात्री 8 वाजता उपस्थित उपासक बांधवाना धम्म देसना देणार आहेत.

ही धम्म पदयात्रा परभणीहून निघाली असून चैत्यभूमी (दादर) मुंबई येथे जाणार आहे. यात ११० थायलंड येथील आंतरराष्ट्रीय भिक्खू तसेच भारतातील भिक्खू संघ, उपासक आदींचा सहभाग आहे  ही पदयात्रा 30 जानेवारी रोजी सोमवारी वैजापूरात दाखल होणार असून 31 जानेवारीला सकाळी येवला



या ठिकाणी रवाना होणार आहे. शहरातील उपासक, उपासिकांनी बुद्धांच्या अस्थींचे दर्शन आणि धम्मदेसनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तथागत भगवान गौतम बुद्ध प्रचार व प्रसार समिती वैजापूर यांनी केले आहे. वैजापूर तालुक्यातील सर्व सामाजिक, राजकीय, नगरसेवक, नगरसेविका शैक्षणिक, पत्रकार, आंबेडकरी चळवळीतील सर्व नेते, पदाधिकारी, अधिकारी, शिक्षक बंधू भगिनी, उपासक, उपासिका, युवक, युवती आदींनी एकत्र येत स्वागताची जय्यत तयारी सुरु केली आहे.

तथागत भगवान गौतम बुद्ध–अस्थिधातू एक ऐतिहासिक धम्मप्रचार वारसा

जन्म –इ .स .पू.–563 वर्षे

महापरिनिर्वाण–इ .स .पू.– 483 वर्षे

आजपर्यंत थायलंड येथील राजे व थायलंड येथील भिक्खू संघ यांनी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या अस्थिधातू आजही जतन करून ठेवल्या असून ही पवित्र व पावन स्मृती अतिशय पावित्र्य राखून जतन केलेली आहे .

हा ऐतिहासिक धम्मप्रचार  वारसा  तर आहेच पण वैजापूर तालुक्यासाठी सर्वांत आश्चर्यकारक व अद्भुत घटनासुद्धा आहे . या अस्थिधातू सुवर्ण कलशा मध्ये तेव्हापासून  जतन करून ठेवले आहे  हे पिढ्यान् पिढ्यां थायलंड भिक्खू संघाकडून प्रचार आणि प्रसारामुळे शक्य झाले आहे .आणि 30 जानेवारी ला वैजापूर तालुक्यात हा अस्थीकलश घेऊन महाधम्म पदयात्रा  करत 110 थायलंड भिक्खू संघ दाखल होणार असून प्रत्यक्ष डोळ्यांनी तथागत गौतम बुद्धांचे अस्थिधातू वैजापूर वासियांना पाहता येणार आहे तसेच अभिवादन सुद्धा करता येणार आहे .




नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि   अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर

घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181

वितरण स्थिती 9021395308 9657398232

घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com

sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर,  चिकलठाणा,  औरंगाबाद

# अमेरिकेने बदलली भूमिका ?

आधुनिक केसरी

गुजरात दंगलीबाबत ‘बीबीसी’ने नुकताच प्रदर्शित केलेल्या माहितीपटावरून देशातील राजकीय वातावरण सध्या चांगलेच तापले आहे. केंद्र सरकारने या माहितीपटावर बंदी घातल्यानंतर याचे पडसाद आता जगभरात उमटू लागले आहेत. अमेरिकेनेही या संदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. विशेष म्हणजे अमेरिकेने ४८ तासांत आपली भूमिका बदलली असून माध्यम स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हवाला देत एकप्रकारे अमेरिकेने बीबीसीच्या माहितीपटाला पाठिंबा देण्याचा प्रयत्न केला आहे. यासंदर्भात बोलताना, अमेरिकेच्या राष्ट्रपती कार्यालयाचे प्रवक्ते नेड प्राइस, म्हणाले, आम्ही नेहमीच माध्यम स्वातंत्र्याचे समर्थन केले आहे, ते आम्ही यापुढेही करत राहू. लोकशाहीतील माध्यम स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मावनाधिकाराचे महत्त्व आम्हाला माहिती आहे. लोकशाहीच्या मजबुतीसाठी ते आवश्यक आहे. आम्ही भारतासह जगभरात हा मुद्दा मांडला आहे. विशेष म्हणजे सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत नेड प्राईस यांना बीबीसीच्या माहितीपटाबाबत विचारण्यात आले होते. यासंदर्भात बोलताना गुजरात दंगलीवरील माहितीपटाबाबत कल्पना नसल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. “तुम्ही ज्या बीबीसीच्या माहितीपटाचा उल्लेख करत आहात, त्याबद्दल मला माहिती नाही. मला फक्त अमेरिका आणि भारत या दोन देशांतीस संबंध मजबूत करण्यासाठी असेल्या सामायिक मुल्यांची जाणीव आहे. भारतात जे काही घडत आहे, त्याबाद्दल आम्हाला चिंता आहे. आम्ही वेळोवेळी याबाबत आवाज उठवला आहे”, असे ते म्हणाले होते. महत्त्वाचे म्हणजे गेल्या आठवड्यात पाकिस्तानी वंशाचे खासदार इम्रान हुसैन यांनी ब्रिटिश संसदेत या माहितीपटाचा मुद्दा उपस्थित केला होता. संदर्भात बोलताना पंतप्रधान ऋषी सुनक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा बचाव करत बीबीसीच्या माहितीपटाशी सहमत नसल्याची प्रतिक्रिया दिली होती.

# संविधानाने सवलत नाही संधी दिली

आधुनिक केसरी



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

**भारतीय संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० रोजी झाली. आज सत्तर वर्षे होऊन सुद्धां भारतातील सुशिक्षित लोक संविधानाप्रती अज्ञानी आहेत. जगातील कोणत्याही देशात अशी परिस्थिती नसेल अशी परिस्थिती भारतात आहे. भारतीय राजकारण्यांनी संविधानाची योग्य अशी अंमलबजावणी केली नाही. आणि विषमतेची बिजे रोवणाऱ्या विषमता वादी व्यवस्था कायम रहावी असे वाटणाऱ्यांनी संविधाना विषयी चुकीची माहिती देऊन संविधान भारतीय नागरिकांपर्यंत पोहचलेच नाही. आजही स्वतः ला विद्वान समजणाऱ्या लोकांना भारतीय संविधानाचे ज्ञान नसेल तर अशा लोकांना सुशिक्षित कसे म्हणायचे.**

आजही स्वतः ला उच्च विभूषित समजणारे लोकांच्या घरामध्ये संविधान नसेल, ते वाचण्याची समजून घेण्याची आवड नसेल, तर त्या लोकांना भारताचे सुसंस्कृत व जागृत नागरिक म्हणता येईल का ? जर देशामध्ये सुसंस्कृत आणि जागृत नागरिक नसतील तर त्या लोकांच्या डोक्यात देशप्रेम आणि देशहीत असते हे म्हणणे म्हणजे केवळ अंधश्रद्धा आहे. आपण दरवर्षी प्रजासत्ताक दिन साजरा करतो. परंतु प्रजासत्ताक शब्दांचा अर्थही लोकांना कळाला नाही. भारतीय संविधानावर प्रजासत्ताक दिनी सखोल अशी चर्चा झाली नाही. भारतीय संविधान भारतीय जनतेच्या हिताचे कसे आहे हे जर भारतीय जनतेला माहिती नाही तर त्या देशाची वैचारिक पातळी काय असेल याची कल्पना येते. भारत एकमेव असा देश आहे जेथे सरकार देशाच्या संविधाना विषयी जनजागृती करत नाही, काही लोक डॉक्टर बाबासाहेब यांनी संविधान लिहले म्हणून वाचत नाहीत, काही लोकांनी तर अजून संविधान बघितले पण नाही. काही लोकांनी बघून ही त्याला स्पर्शही केला नाही, संविधान न बघता, न वाचता काही लोक संविधाना विषयी चुकीचे विधान करतात परंतु लोकांवर अंकुश निर्माण करण्यास जाणीव पुर्वक प्रयत्न करत नाही. ज्या नागरिकांना संविधान याविषयी ज्ञानच नाही, ज्यांच्या घरात भारतीय संविधान नाही अशा लोकांनी द्वेष भावना व चुकीच्या ऐकीव माहिती वरून संविधानाबद्दल चुकीचे समज निर्माण करून घेतले. दुसरी कडे भारतीय संविधानाला स्वतः ची मालकी समजणाऱ्या लोकांनी संविधानाला डोक्यावर घेतले परंतु कधी डोक्यात घेतले नाही. आणि डोक्यावर घेऊन संविधान न वाचता चुकिचे वक्तव्य करून चुकिचे व अपुरे संविधान समाजात पेरण्याचा प्रयत्न केला. यामुळे खरे संविधाना आणि संविधानाचा अर्थच भारतीय नागरिकांना माहिती झाला नाही. भारतीय नागरिकांना संविधान साक्षर करण्याची नैतिक जबाबदारी प्रशासकीय अधिकारी आणि प्रसारमाध्यमे यांची असल्याने त्यांनी आपापली कामे योग्य पद्धतीने केली नाही म्हणून संविधानाचे महत्त्व लोकांना
कळाले नाही.

भारतीय संविधानाने धर्म, जात, पंथ, वर्ण,लिंग अशा कोणत्याही बाबींचा विचार न करता केवळ मानवाला मानव म्हणून अधिकार दिला. व वर्षानुवर्षे चालत आलेल्या उच्च निच्चतेच्या उतरंडीला सुरुंग लाऊन पुन्हा ती निर्माण होणार नाही, देशामध्ये कोणत्याही जाती, धर्म वर्ण यांना महत्त्व न देता माणसाला माणूस म्हणून किंमत देण्यात येईल ही संविधानाची शिकवण असताना सुद्धां आपण बघतो देशातील राज्यकर्ते धर्माचे राजकारण करतात, मिडिया एकाच धर्माला महत्त्व देऊन संविधान, विज्ञान, ज्ञान, स्वाभाविक, तर्क अशा बाबींची अवहेलना करून दररोज इलेक्ट्रॉनिक मिडिया च्या माध्यमातून समाजात अज्ञान, अंधविश्वास, विषमता, धार्मिक श्रेष्ठत्व, द्वेष पसरवून माणसाला, माणुसकीला दाबण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु माणसाला जागृत करणारे, हक्क अधिकारी बहाल करणारे आणि देशात सर्वोच्च असणाऱ्या संविधानावर चर्चा करून, संविधानावर डॉक्युमेंटरी तयार करून जागृती केली जात नाही म्हणून आजही समाजामध्ये संविधाना बद्दल पाहिजे ती  गंभीरता नाही म्हणून चुकीचे शब्द वापरून चुकिच्या पद्धतीने संविधानाची मांडणी होत आहे. आणि त्यातीलच एक चुकीचा समज म्हणजे संविधानाने सवलत दिली व त्या सवलतीचा फायदा एका जातीला होतो, संविधानाच्या सवलतीचा फायदा एकाच जातीला होतो असे संविधान कधीच न बघणारा म्हणतो. आणि जो डोक्यावर संविधान घेतो त्याला या प्रश्नावर संविधानीक उत्तर देता येत नाही. म्हणून तो माझ्याच बापाने माझ्याच साठी संविधान लिहले असे बोलून आपली वैचारिक पातळी दाखवून देतो.



संविधान कोणालाच सवलत देत नाही तर संधी देते. सवलत आणि संधीमध्ये खुप मोठा फरक आहे. वर्ण व्यवस्थेतुन जातीव्यवस्थेत रुपांतर होऊन माणसाचे अनेक तुकडे निर्माण झाले. एक माणूस दुसऱ्या माणसाजवळ येत नव्हता हे काम भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आणि तुकडा कोणत्याही जातीचा असो तो माणूस म्हणून एकत्र येऊ शकतो. आणि सरकार माणसामध्ये भेद करणार नाही असे कलम १४ मध्ये नमुद करून दिले. पूर्वीच्या काळी स्पृश्य अस्पृश्यता एवढी वाढली होती की माणसाचा माणसाला स्पर्श झाला तर माणुसच अपवित्र होत होता. परंतु संविधान लागु झाल्यानंतर असे वर्तन कोणी करणार नाही म्हणून कलम क्रमांक  १७ आहे. या कलमामुळे माणसाला माणसात राहण्याची संधी मिळाली, एकत्र बसुन एकत्र खाण्याची पिण्याची संधी मिळाली जी अगोदर नव्हती. धर्म पंडितापुढे आणि गावातील मुख्य लोकांपुढे बोलण्याचा अधिकार नव्हता, त्यांचे म्हणणे खरे की खोटे हे पटवून देण्याचा अधिकार नव्हता तो अधिकार भारताच्या संविधाना मार्फत कलम क्र. १९ द्वारे मिळाला आणि भारतीय लोकांना अभिव्यक्त होण्याची संधी मिळाली. भारतामध्ये बहूजन वर्गातील लोकांना शिक्षण नाकारले होते. बुद्धीमत्ता, ईच्छा असुनही त्यांना शिक्षण घेता येत नव्हते. हजारो वर्षांपासून शिक्षणाची मक्तेदारी एकाच वर्णाकडे होती परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या कलम २१ क नुसार शिक्षणाणी संधिच निर्माण करून दिली नाही तर मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची संधी निर्माण करून दिली. वरील सर्व बाबींची जी संधी निर्माण करून दिली त्या अगोदर काही शब्द महत्वाचा आहेत ते म्हणजे धर्म, पंथ, जात, लिंग, वर्ण, जन्मस्थान यावरून कोणाताही भेद करून वरिल संधी नाकारता येणार नाही. वरील गोष्टी भारतीय नागरिकांना मिळाव्या ही बाब संविधानामध्ये नमुनद आहे तर एकाच धर्माला वा जातीला सवलत आहे हे निव्वळ मेंदु न वापरता केलेले विधान आहे. म्हणजे आम्हाला सवलती आहेत असे म्हणणाऱ्याला आणि त्यांना सवलती आहेत म्हणणाऱ्या दोघांनाही संविधान समजून घेण्याची गरज आहे.

सत्तर वर्षे होऊनही जर संविधानाची जागृती होत नसेल तर देशातील राज्यकर्ते आणि जनता किती निष्क्रिय आहे याची प्रचिती येते. विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून आपले देशात वर्तन असावे असे नागरिकांचे कर्तव्य असताना आजही अंधविश्वास, पाखंड याचा प्रचार आणि प्रसार केला जातो त्याचा संबंध धर्माशी जोडला जातो आणि मग त्यावर चर्चा घडवून आणल्या जातात. परंतु सत्तर वर्षे होऊनही देशात लोकशाही रूजली का ? लोकशाहीचे फळ लोकांना चाखायला मिळाले का ? नसतील मिळाले तर काय उपाययोजना कराव्यात, संविधानातील कोणते कलमे आहेत जे भारतीय नागरिकांना अधिकारी बहाल करून संरक्षण प्राप्त करून देते यावर मात्र चर्चा करायला कोणीच तयार नाही. आणि संविधानाचा न वाचता, चुकिचा अर्थ काढून गैरसमज पसरवले जातात आणि मुळ संविधान बाजूला राहुन वेगळ्याच विषयावर चर्चा होते.

आपण सखोल संविधानाचा अभ्यास केला तर संविधानाने कोणालाच सवलत दिली नाही परंतु सर्वांना एकत्र येऊन आपापला विकास करण्यासाठी, प्रगती करण्यासाठी सर्व रस्ते मोकळे करून दिले आहेत. हजारो वर्षापासून विकासाचे प्रगतीचे रस्ते पुर्णपणे बंद करून माणसालाच गुलाम करून ठेवले होते. आणि त्या गुलामीच्या बेड्या वैचारिक बेड्या तोडून एकच समता वादी रस्ता बाबासाहेब आंबेडकर यांनी खुला करून दिला आणि खुल्या करून दिलेल्या रस्त्याला जर कोणी सवलत म्हणत असेल तर ते वैचारिक अपंगत्व आहे. हे वैचारिक अपंगत्व नाहीसे करण्यासाठी प्रत्येकाने संविधान साक्षर होणे आवश्यक आहे.

# मुलगी जन्माला येणे गुन्हा आहे का ?

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**आजही आपल्या समाजात मुलींना ओझे मानले जाते, लातूरची ही घटना या सत्याला पुष्टी देते. मुली या समाजासाठी ओझे बनल्या आहेत, म्हणूनच गर्भातच मारल्या जातात आणि जगात आल्या तर घरच्यांच्या हातून मारल्या जातात. महराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात पहिली मुलगी असताना दुसरीही मुलगी झाली म्हणून आईनेच आपल्या तीन दिवसांच्या मुलीचा गळा दाबून हत्या  केली आहे. या धक्कादायक घटनेने लातूर हादरला असून, याप्रकरणी निर्दयी आईविरोधात गातेगाव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्राशिवाय देशात अनेक ठिकाणी हे दिसून आले आहे.**

राजधानी दिल्लीतील मालवीय नगर पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या चिराग दिल्ली गावात मुलाच्या इच्छेने आईला राक्षस बनवले  आईने आधी आपल्या दोन महिन्यांच्या चिमुरडीचा गळा दाबून खून केला आणि नंतर तिला शेजारीच असलेल्या ओव्हनमध्ये फेकून दिले. पंजाबच्या लुधियानामध्ये दुसऱ्या मुलीला जन्म दिल्यानंतर अस्वस्थ झालेल्या ३० वर्षीय महिलेने आपल्या चार वर्षांच्या मोठ्या मुलीची हत्या केली . ही महिला बिहारमधील एका स्थलांतरित मजुराची पत्नी असल्याचे पोलिसांनी सांगितले. लुधियानाच्या सालेम टाबरी भागातील नवनीत नगरमध्ये असलेल्या घराच्या बाथरूममध्ये भिंतीवर आणि फरशीवर वार करून महिलेने आपल्या चार वर्षांच्या मुलीची हत्या केल्याचा आरोप आहे. अशी प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यातून येत असतात. हा आपला समाज आहे का ? हीच का आपली संस्कृती ? या आधुनिक युगातही आपण जुन्या परंपरेचे बळी आहोत का ? आपल्याला या व्यवस्थेचा आणि अशा लोकांचा तिरस्कार वाटतो, जे ना मनाचे ऐकतात, ना कोणाच्या आवडी-निवडीला. असे लोक कोणत्याही प्रकारे क्षम्य नसतात, जरी ते खरे पालक असले तरीही. त्या जीवनाला स्वप्न पाहण्याचा अधिकार नाही का ? एखाद्या जीवाला आपल्या जीवनाबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार नाही का ? आणि ती मुलगी आहे म्हणून. मुलगा असेल तर सात रक्त माफ आणि मुलगी असेल तर चुकीचा विचार करणेही गुन्हा आहे. मुलाच्या हव्यासापोटी अर्धा डझन मुलींना जन्म द्यायला लोक मागेपुढे पाहत नाहीत, पण त्यांच्या भविष्याचा विचार का करत नाहीत. आपण अमेरिका आणि जपानच्या नियमांचे स्वागत करायला पाहिजे. जिथे प्रत्येकाला समानतेने पाहिले जाते .आपला देश असा एकमेव देश आहे जिथे लोकांनी स्वतःचे नियम बनवले आहेत.

मुली मुली असतात ती दोन घरची लक्षी असते., मुली बहिणी असतात, मुली बायका असतात, जगात असे कोणतेही नाते नाही जे मुलीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. पण सत्य हे आहे की आजही आपल्या देशात स्त्री भ्रूणहत्या होत आहे.जन्म आधीच तीला मारून टाकल्या जात आहे. आज आपला समाज  स्त्रियांना मुलांपेक्षा कमी दर्जाचे  समजतात.  जगातील प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे, मग ते अवकाश असो, विज्ञान असो, तंत्रज्ञान असो वा उद्योग. एवढेच नाही तर आज आपल्या देशाच्या मुली देशाच्या सुरक्षेसाठी तैनात आहेत. असे असताना मुलीबाबत भेद केला जातो.  मुलगी म्हणजे परक्याचं धन, मुलगी म्हणजे काळजाचा तुकडा, मुलगी म्हणजे आशेचा किरण, मुलगी म्हणजे घराची लक्ष्मी. असं बरचं काही मुलींना अगदी तंतोतंत लागू पडतं. मग



मुलगा म्हणजे वंशाचा दिवा असं मानलं जातं. पण हा वंशाचा दिवा अखंड तेवत ठेवायचा असेल तर वात म्हणून एक मुलगी हवीच असते. ज्या मुलीला समाज परक्याचं धन समजतो ती असल्याशिवाय कोणाच्याही आयुष्यात श्रीमंती येत नाही ,है आपल्या समाजाला कळेल केव्हा. ?

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संतांनी देव पाहिला; हे काय खोटे आहे ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**सन २०२३मधील महाराष्ट्राचा प्रादेशिक वार्षिक निरंकारी संतसमागम पावन स्थळ- डीएमआयसी बिडकीन ता.पैठण जि.औरंगाबाद येथे दि.२७ ते २९ जानेवारीपर्यंत चालणार आहे. त्यात "रुहानियत और इन्सानियत संग संग..." या अनाकलनीय पण अत्यावश्यक विषयावर ब्रह्मज्ञानी संतसज्जन व गुणीजन मार्गदर्शन करणार आहेत. कारण खरा माणूस ब्रह्मवेत्त्या सद्गुरूला शोधून त्याच्याकडून ब्रह्मप्राप्ती करून घेतो. तत्पश्चात त्याच्या अंगी आत्मिकता रूजू लागते. आत्मिकता या दिव्य गुणासोबतच त्याच्या मनीमानसी मानवतासुद्धा घर करू लागते. आत्मिकता, मानवता, मानव एकता तथा विश्वबंधुत्व म्हणजे काय? ते कसे सिद्ध व साकार करू शकतो? आदी शंका-कुशंकांचे बाळबोध शब्द आणि दृष्टांताद्वारे अलबत समाधान करण्याचा खासा प्रयत्न बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींनी येथे केला आहे...**

माणसाच्या हृदयापासून निघणारे वचन आणि त्यानुसार होणारे कर्म यांत समानता दिसून आली पाहिजे. तो कधी कधी अत्युत्साहाने मुखावाटे अशक्यप्राय गोष्ट बोलून जातो. मग मात्र बोलल्याप्रमाणे कृती करण्याची मुळात त्यात क्षमताच नसते. त्यामुळे त्याचे बोल "बोल बोल नुसतं कांद्यांचं फोल" सिद्ध होतात. आपण जसं बोलू तसं वागू, यास्तव पाठीवर सर्वशक्तिमान पाठीराख्याचा हात असावा लागतो. असा सर्वशक्तिमान पाठीराखा जगात सद्‍गुरूशिवाय दुसरा कोण असू शकेल ? सद्‍गुरू प्रेरित हदयस्थ भाव हे अतिशय कळवळा, तळमळ, आत्मविश्वास, आत्मभान व आत्मियता यांचे उद्‍घोषक ठरतात. त्यांत एक प्रकारचा आव नसतो तर तडफदार ताव असतो. ही अंतरात्म्यातून निर्माण झालेली एक महान शक्ती असते. तिलाच जगाच्या मालकाने, आपल्या सद्‍गुरू माता सुदीक्षा सविंदर हरदेवजी महाराजांनी आत्मिकता म्हणून संबोधले आहे, अशी आत्मिकता ज्या ज्या महापुरुषांच्या अंगांगात भिनली त्या त्या महापुरुषांची पाऊले मानवतेच्या मार्गावर आपोआप चालू लागली आहेत. वेगळा असा मानवता मार्ग चोखाळण्याची, साकारण्याची किंवा आखण्याची काहीही गरज नाही, असे दासाला वाटते. कोणत्याही व्यक्तीला धरून-बांधून, मारून-मुटकून तिच्यात आत्मिकता रूजविता येत नाही. जो वर्तमान पैगंबर- समर्थ सद्‍गुरूला शरण जातो, तोच सद्‍गुरू कृपेने आत्मिकता बरोबरच खडतर अशा मानवता मार्गावर आपोआपच आनंदाने चालू लागतो. यासाठीच ग्रंथकार शहंशाह अवतारसिंहजी महाराज फर्मावतात-

**"सच्ची मंज़ल सच्चा मारग हर बन्दे नूं भुल्ला ए|**
**कहे अवतार गुरु दा एह दर हर बन्दे लई खुल्ला ए|"**
**(सम्पूर्ण अवतार बाणीः पद क्र. ३५७)**

आपुलकी, प्रेम, नम्रता, दया, क्षमा, शांती आदी दैवीगुणांमुळे आत्मिकता अधिक प्रबळ आणि शृंगार चढविल्याप्रमाणे सुंदर होते. आत्मिकतेच्या अंतःप्रेरणेच्या बळावर म्हणजेच आंतरिक तळमळीने दास सचेत करत आहे. यात मानवता वा माणुसकीच्या नात्याचा ओलावाही अंतर्भूत आहे. लोक कोणाच्याही चोपड्या-चोपड्या गोष्टींवर भुलून- भाळून आंधळेपणाने कसाही गुरू करतात. पूजापाठ, होमहवन, मंत्रतंत्र, जारणमारण, जादूटोणा किंवा इतर क्रियाकलाप सांगणारा गुरू करतात. संपत्ती, संतती व आयुरारोग्य यासाठीच आपला जन्म समजतात. यांत मानवी जीवनाचा मूळ उद्देशच बाजूला राहतो. ईश्वरप्राप्ती हाच तो खरा मूळ उद्देश आहे. आपण त्यांच्याजवळ देव पाहण्याची इच्छा व्यक्त केली, तर ते वेळ मारून नेतात. ते प्रांजळपणे कबुली देतात, "आजवर देवाला कोणीच पाहू शकले नाही, मग मी तरी कसा बघेन ? मी प्रयत्नरत आहे."



अर्थात- मी जागतच आहे; तसे तुम्हीपण जागतच रहा! असाच काहीसा अर्थ निघतो. माघार न घेता ते पुढे सांगतात, जप, तप, व्रत, उपवास, शिर मुंडन, देह दंडन करत रहा. पूजापाठ, मंत्रोच्चार, होमहवन, आदी करत रहा, दरम्यान तुम्हाला साक्षात्कार होईल. स्वप्नामध्ये देव दर्शन देईल. हे सर्व उपद्‍व्याप आहेत, ते सर्व भ्रम, भ्रांत, खोटे आणि फसवणूक करणारे उद्योग आहेत. यात आपले सोन्यासारखे जीवन व वेळही बरबाद होत असते. तो हा परब्रह्म विठ्ठल ब्रह्मदर्शी- ब्रह्मवेत्ता सद्‍गुरू प्राप्त झाल्याशिवाय खऱ्या विराटरुपात दिसेलच कसा ? संत महात्म्यांनी अभंगवाणी व संतवचनांद्वारे सांगितले आहे, की देवाला पाहता, जाणता, मानता व पुजता येतो. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटले आहे-

**"हरि पाहिला रे, हरि पाहिला रे।**
**हरि येथे रे, हरि तेथे रे।**
**हरि विण स्थान नाही रिते रे।**
**सबाह्यांतरी अवघा व्यापक मुरारी।।"**

कोण म्हणतोय, ईश्वर पाहण्यासाठी संपूर्ण आयुष्य वाया दवडावे लागते म्हणून... भगवान श्रीकृष्णाने धनुर्धर अर्जुनास एका क्षणार्धात- डोळ्याची पापणी झाकून परत उघडत नाही एवढ्या वेळात आपले विशालरूप दाखविले होते. मग हे खोटे म्हणावे का ? हे खरे आहे, म्हणत असाल; तर याचा प्रत्यय आपण घेऊ शकत नाही का ? अवश्यच घेऊ शकतो. आपण डोळसपणे- डोळे उघडे ठेऊन सद्‍गुरू केला पाहिजे. "तो म्हणाला म्हणून मी गुरू केला." अशी भूमिका आपल्या सर्वनाशास कारण ठरते. गुरूला आपणच कसोटीवर तपासून घेऊन नंतरच त्यास आपल्या हृदयात सद्‍गुरूस्थानी विराजमान केले जावे. स्वामी विवेकानंदजींनी तब्बल चोवीस गुरूंना कसोटीच्या तत्वांवर चाचपून पाहिले व नंतर पिटाळून लावले. रामकृष्ण परमहंस यांनी त्यांच्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. म्हणून त्यांना आपल्या हृदयात सद्‍गुरूस्थानी विराजमान केले. त्यांच्या कृपाशीर्वादाने त्यांनी आत्मिकतासह मानवतेची डगर सहजच सर केली. त्यांनी "आलं उतू अन् घातलं चाटू" अशी घाई, गडबड कधीच केली नाही. आपल्यालाही त्याच तत्वांच्या आधाराने सद्‍गुरू- परमगुरू शोधणे अत्यावश्यक आहे. स्वामी विवेकानंदजी तथाकथीत गुरूंना तीन प्रश्न विचारत होते. तेच तीन प्रश्न आपणही उपयोगात आणलेच पाहिजे. दासाने सुद्धा प्रथम याच तत्वांच्या कसोटीने निरंकारी ब्रह्मज्ञान घेतले. कुणीतरी सांगितले आणि दास लगेचच फसी पडला, नादी लागला किंवा फंदी झाला, असे मुळीच नाही. ते प्रश्न असे- १) या जगात देव आहे का ? जर उत्तर- आहे, तर पुढचा प्रश्न- २) तुम्ही देवाला पाहिले का ? जर उत्तर- होय, तर पुढचा प्रश्न- ३) मला दाखवू शकाल का ? जर उत्तर- होय, असेल तर तोच आपला सद्‍गुरू मानावा. त्याचे चरण धरून त्यास अनन्यभावाने शरण जावे आणि त्याचेकडून ब्रह्मज्ञान घ्यावे अर्थात ईश्वरप्राप्ती- देवदर्शन म्हणजेच देवाची ओळख पटवून घ्यावी. तेव्हाच आपणास पुढील संतवचन सत्यवचन वाटेल-

**"मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश!**
**माझा देव माझ्याकडे पहात आहे!"**

निरंकारी मिशनच्या विश्वबंधुत्व अभियानात जगातील सर्व जाती, धर्म, पंथ, वर्ण आदी वैविध्याची कोणीही व्यक्ती निःसंकोचपणे प्रवेश घेऊ शकते. मात्र तत्पूर्वी निरंकारी ब्रह्मज्ञान सहकुटुंब प्राप्त करणे अगत्याचे ठरते. दूधपित्या बालकांपासून तर सर्व वयोगटातील स्त्रीपुरुषांना ब्रह्मज्ञान घेण्यास काहीच आडकाठी नाही. वरील सद्‍गुरू पडताळ्याचे प्रश्न छोटे बालक वगळून परमपिता परमात्म्याविषयीच्या ज्ञानावर जे सांगू, बोलू वा चर्चा करू शकतात, अशा निरंकारी बंधुभगिनींना विचारावेत. ते आपणास वरील तीनही प्रश्नांची चटकन उत्तरे देऊ शकतात. मात्र तिसऱ्या प्रश्नाच्या प्रत्यक्ष कृतियुक्त उत्तरासाठी मंडळाच्या मान्यताप्राप्त ज्ञानदाता- ज्ञानप्रचारक महात्मा किंवा भगिनी यांच्याकडे घेऊन जातील. तेथे आपल्याला काही आढेवेढे न घेता, काही काळ वाट पाहण्यास न लावता तत्क्षणी देवदर्शन घडविले जाते. म्हणून संतवचनाप्रमाणेच दासाला सुद्धा भरकटत जाणाऱ्या किंवा तटस्थ लोकांविषयी आत्मिक कळकळा दाटून येतो. युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज म्हणतात-

**"मानवता की नेक डगर से भटक गया इन्सान क्यों।**
**अपने संग औरों की हानि करता है नादान क्यों।**
**सन्तों का रस्ता सुगम है उस पर बन्दे चलता चल।**
**कहे 'हरदेव' मिलेगी मंज़िल पग पग आगे बढ़ता चल।"**
**(सम्पूर्ण हरदेव बाणीः पद क्र. १५४)**

दास हरिच्या लाडक्या भक्तांना विनंती करतो, की बांधवांनो, मानव जन्माचे सार्थक करण्यासाठी डोळसपणे सद्‍गुरू करावा जी! कारण ब्रह्मज्ञानी संत महापुरुषांच्या घरी विठ्ठल परब्रह्म स्वतः राबत असत, हे आम्ही संतचरित्रांतून वाचत आलोत. दासाला ती चमत्कारिक गोष्ट खोटीच वाटत होती. विठ्ठल परमात्म्याने संतघरी झाटलोट, दळणकांडण, उष्टेखरकटे काढले. संतांचे बाळंतपण केले, सासुरवाशीण सुनेच्या रुपाने पतीसेवा केली. हे सगळे आता सत्य पटू लागले आहे. दासाची पत्नी- गृहलक्ष्मी संत आशाताई आपले अवतारकार्य संपवून ब्रह्मलीन झाली. तेव्हा वाटले होते, की देवाची अवकृपा झाली, घरात राबती- नांदती लक्ष्मी निघून गेली. पण नाही, तीच्या ऐवजी लक्ष्मीची अनेक रुपे आपल्या घरी पाणी भरू लागली आहेत. दासाची मामी संत अहिल्याबाई गुरनूले, मेहुण्या ब्रह्मज्ञानी संत उषाताई मोहूर्ले, संत चंदाताई लेनगुरे, संत दर्शनाताई निकुरे आणि संत मीराताई चोपकार या अडचणीच्या प्रसंगी वेळोंवेळी धावून येत आहेत. पाणी, धुणे, भांडी, केर काढणे आदी स्वच्छतेची कामे करत आहेत. ती त्यांची दैवीरुपे नाहीतर आणखी काय म्हणावी ? त्यांच्या रुपाने आदिशक्ती महामाया लक्ष्मी आपल्या घरी आठदहा दिवसांच्या फरकाने येत आहे. राबत आहे, कष्टत आहे, नांदत आहे. म्हणून जगद्‍गुरू संत तुकाराम महाराजांनी म्हटले-

**"बुडते हे जन, देखवेना डोळा।**
**म्हणोनि कळवळा येत असे।"**

दयाळू, कृपाळू व ममतामयी संतांची ती लक्ष्मीरुपे आम्हां दोघे बापलेकांना जराही एकाकी वाटू देत नाहीत. खरेच, आम्ही किती भाग्यवंत नाही का ? कारण दासाच्या घरी प्रत्यक्ष परमेश्वर- देव- निरंकार अनेक लक्षमीरुपाने राबत, कष्टत, नांदत आहे. त्या सर्व लक्ष्मीरुपांना आपले दंडवत प्रणाम! हेही उदाहरण संतांतील आत्मिकता व त्यासोबतच मानवता अशी घट्ट रुजलेली सुस्पष्टपणे दृष्टीस पडते. मग सांगा, याहून साधासोपा दृष्टांत तो कोणता ?

!! ५६व्या महाराष्ट्र निरंकारी संतसमागमाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी! मोठ्या प्रेमाने **बोलुया जी, धन निरंकार जी आणि नमस्कार जी !!**

# संत ताजुद्दीन बाबा




रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**संत ताजुद्दीन बाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक आहे. भारत ही संतांची भूमी आहे. हीबाब संपूर्ण जग जाणतो. त्यामुळे या भारत भुमित कोणत्या-ना-कोणत्या रूपाने प्रत्येक धर्मात संत जन्म घेत असतात व सर्वच धर्माच्या संस्कृतीचे जतन होत असते. आज संपूर्ण जग जाणते की भारत हे शांततेचे प्रतिक आहे.**

याचे मुख्य कारण म्हणजे या भुमित अनेक धर्म जन्माला आलेत त्यामुळेच अनेक संस्कृती दिसून येतात आणि मुख्यत्वे करून एकोप्याने राहतात हाच संत भुमिचा खरा गोडवा आहे. नागपूरातील संत ताजुद्दीन बाबा यांची अपार महिमा आपल्याला पहायला मिळते आणि जगजाहीर आहे.ताजुद्दीन बाबांचा जन्म २७ जानेवारी १८६१ ला नागपूर शहरापासून १५ किलोमीटरवर असलेल्या कामठी या गावी झाला.बाबा एकवर्षाचे असतांनाच त्यांच्या वडिलांचा देहान्त झाला.यानंतर त्यांच्या ९ वर्षाच्या वयातच आईचा सुध्दा स्वर्गवास झाला.यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या आजीने करून त्यांना लहाण्याचे मोठे केले.ताजुद्दीन कामठीतील मदरशांमध्ये शिकत होते.कामठीतील मदरशांमध्ये अचानक हजरत अब्दुल्ला शाह नावाचे फकीर आले आणि त्यांची नजर (बालक) बाबा ताजुद्दीनवर पडली.त्यावेळेस त्या फकीराने शिक्षकाला विचारले "तुम इनको क्या पढाते हो" शिक्षक स्तब्ध झाले आणि फकीरच म्हणाले यह बालक (बाबा ताजुद्दीन) जन्मसेही सब कुछ सीखकर आया है.इतके बोलुन फकीर तेथुन निघुन गेले.ताजुद्दीन बाबांना त्यांच्या मामांनी १८८१ मध्ये म्हणजे वयाच्या २० व्या वर्षी नागपूरची रेजीमेंट नं. १३ मध्ये भर्ती केले.तीन वर्षांनंतर त्यांना मद्रासमधील सागरला पाठविण्यात आले.मद्रासी पलटनमध्ये अचानक विराण जागेवर संत हजरत दाऊद यांच्याशी भेट झाली आणि संपूर्ण रात्र सोबत भजन-कव्वालीमध्ये तल्लीन झाले.ताजुद्दीन बाबा स्वतः देवाच्या आठवणीत डुबुन रहायचे. असे सांगितले जाते की बाबांची ड्युटी "शस्त्रभंडार" देखभाल करण्यावर होती.बाबा आपला पहारा चोख देत होते, अशावेळी रात्री २ वाजता अचानक इंग्रज कैप्टन त्या जागेची पाहणी करायला आला.पाहणी झाल्यानंतर कैप्टन वापस जायला लागला. काही अंतरावर जात नाही तर त्याला जो शिपाई पहारा (ताजुद्दीन) देत होता तोच शिपाई पुन्हा दिसला. कैप्टनला गुस्सा आला पुन्हा वापस पहिल्या जागेवर गेला तर तीथे पहाले तर तो शिपाई (ताजुद्दीन)आपल्या जागेवरच होता. यानंतर इंग्रज ऑफिसरने बाबांना पेशीसाठी बोलावले व विचारले की आम्ही तुम्हाला दोन-दोन ठीकाणी पहाले.तुम्ही देवाचे अवतार आहात का? यावर बाबांना घुस्सा आला.परंतु इंग्रज



समजले हा शिपाई साधारण व्यक्ती नसून संत महात्मा आहे.हा त्यांचा पहिला चमत्कार दिसून आला.कालांतराने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.बाबांची वेगवेगळी हरकते पाहून त्यांच्या आजीने ताजुद्दीनला पुन्हा कामठीला आणले व अनेक डॉक्टरांना दाखविले.परंतु त्यांनी आत्मा व परमात्माची एकरूपता अवगत केल्याचे दिसून आले.काही लोक त्यांना पागल समजायला लागले.परंतु हळूहळू त्यांच्या हातुन अनेक चमत्कार दिसायला लागले.पीडीत लोक आपले दुःख-दर्द बाबांना सांगायला लागले व त्यांच्या नेत्रदृष्टीने बरेही व्हायला लागले.बाबांचे चमत्कार दुर-दुर पर्यंत पसरायला लागले.परंतु काही लोक आपल्या चमत्काराचा चुकीचा फायदा घेत असल्याचे लक्षात आले.तेव्हा त्यांनी पागल असल्याचे सोंग करने सुरू केले व लोक त्यांच्या हरकतींना त्रासुन पोलिस कंप्लेंट केली व २६ ऑगस्ट १८९२ ला कामठीच्या कैन्टोनमेन्ट व जिल्हा मॅजेस्टेट ने पागलखान्यात पाठविले.पागलखाण्यात लॉकपहध्ये बंद केल्यानंतरही लोकांना बाबा नागपूरच्या अनेक भागात दिसत होते.हा चमत्कार सर्वच मोठ-मोठ्या ऑफिसरच्या लक्षात आला.असे अनेक चमत्कार लोकांना दिसायला लागले व बाबा ताजुद्दीन संत झाले.२१ सप्टेंबर १९०८ ला नागपूरचे महाराजा श्रीमंत राजा बहादुर राधोजीराव भोसले यांच्या प्रयत्नाने बाबांना पागलखान्यातुन मुक्त केले राजाने आपल्या महालात आणले व राजांनी ताजुद्दीन बाबांची सेवा केली.संत ताजुद्दीन बाबा हिंदू-मुस्लिमांचे प्रेरणादायी प्रतिक होते.बाबांची तब्बेत काही दिवसांत खालावली व १७ ऑगस्ट १९२५ ला वयाच्या ६६ व्या वर्षी श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांचा स्वर्गवास झाला.त्यामुळे नाम समाधी म्हणून सक्करदरा येथील श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची समाधी बांधण्यात आली याला "लहान ताजबाग" म्हणतात.इथे हिंदू प्रथेनुसार मोठ्या प्रमाणात आजही पुजाअर्चना केली जाते व अंतिम संस्कार लहान ताजबागपासुन १ किलोमीटर अंतरावर असलेल्या ताजबाग येथे करण्यात आला याला "मोठा ताजबाग" म्हणतात. इथे मुस्लिम पध्दतीने पुजाअर्चना केली जाते.याप्रमाणे "मोठा ताजबाग व लहान ताजबाग" हे दोन्ही पवित्र स्थान भारतभर प्रसिद्ध आहे या ठीकाणी दोन्ही धर्माचे लोक एकत्र येतात ही नागपूरसाठी गौरवास्पद बाब आहे.संत ताजुद्दीन बाबांनी आपले पाय ज्या-ज्या ठिकाणी रोवले त्या-त्या ठिकाणी आपल्याला बाबांचे दर्शन अवश्य होईल.बाबाचे अनेक प्रसिद्ध ठिकाण आहेत यात वाकी,पागलखाना हे प्रसिद्ध ठिकाण आहे.बाबाच्या जयंती निमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे संपूर्ण भक्तांना विनंती आहे की वाढते प्रदुषण पहाता जयंतीच्या निमित्ताने आपापल्या पद्धतीने वृक्षारोपण करावे.यामुळे आपल्याला प्रत्येक झाडाच्या मुळात,पानात,फळात आपल्याला बाबांचे दर्शन अवश्य होईल.संत ताजुद्दीन बाबांना कोटी कोटी प्रणाम.

# वजन कमी करण्याचे प्रभावी उपाय

आधुनिक केसरी

लठ्ठपणा एक आजार असून यामुळे केवळ पर्सनॅलिटी खराब होत नाही तर हा इतर आजारांनाही आमंत्रण देतो. लठ्ठपणा वाढल्यास हाय ब्लडप्रेशर, कंबरदुखी, हृदयाचे आजार, गुडघेदुखी यासारखे आजार होण्याचा धोका वाढतो. यामुळे वजन कमी करण्यासाठी लोक डायटिंग करतात किंवा तास न् तास जिममध्ये घाम गाळतात परंतु तरीही वजन कमी होत नाही. कारण त्यांचा डाएट चार्ट योग्य नसतो. आहाराकडे योग्य लक्ष आणि थोडासा व्यायाम केल्याने वजन लवकर कमी करणे शक्य आहे. 21 दिवसाचा डायट प्लान आहे त्यांनी लवकर वजन कमी होते. कोणतेही साईड इफेक्ट नाही कोणतेही आजार होत नाहीत. आणि असतील तर तेही जातात.

1. पपईचे नियमित सेवन करावे. हे फळ प्रत्येक ऋतूमध्ये मिळते. पपईचे सेवन केल्याने शरीरावरील अतिरिक्त चरबी कमी होते.
2. दह्याचे सेवन केल्याने चरबी कमी होण्यास मदत होते. दिवसातून दोन-तीन वेळेस ताक प्यावे.
3. पिंपळाच्या सालीचे चूर्ण भाजून घ्या, दररोज तीन ग्रॅम हे चूर्ण ताकामध्ये टाकून घेतल्यास पोट कमी होईल.
4. आवळा आणि हळद समान मात्रामध्ये बारीक करून चूर्ण तयार करा. हे चूर्ण ताकामध्ये टाकून घ्यावे. या उपायाने वजन जलद गतीने कमी होऊ लागेल.
5. वाढते वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी टोन्ड दुध, टोन्ड दही आणि टोन्ड पनीरचा वापर करावा. या पदार्थांमध्ये कॅलरी कमी असतात, परंतु पोट भरलेले जाणवते.
6. दररोज सकाळी आणि संध्याकाळी चालावे. कमीत कमी 4-5 किलोमीटर जलद चालण्याचा नियम करावा. दुपारचे जेवण केल्यानंतर शतपावली अवश्य करावी. जर तुम्ही रात्री 8:30 नंतर जेवण करत असाल तर पोळी आणि भाताऐवजी डाळ आणि भाज्यांना जास्त प्राथमिकता द्या. रात्री हलका आहार घ्यावा. शक्यतो रात्री शक्य तितक्या लवकर म्हणजे 7 च्या आतच जेवण उरकावे.
7. वजन लवकर कमी करण्याची इच्छा असेल तर जास्तप्रमाणात पांढरे पदार्थ (बटाटे, मैदा, साखर, तांदूळ) कमी करा आणि मल्टीग्रेन किंवा मल्टीकलर पदार्थ ( डाळी, गहू, गजर, पालक, सफरचंद, पपई) खाण्यावर जास्त भर द्या.

# आम्ही प्रजासत्ताक आहोत का ?



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**26 जानेवारी 1950 रोजी आम्ही प्रजासत्ताक झालो. हा आमचा गणतंत्र दिवस आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी जरी आम्ही स्वतंत्र झालो असलो तरीसुद्धा आम्हाला आमचे संविधान 26 जानेवारी 1950 रोजी प्राप्त झाले. या संविधानामुळे आम्हाला स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून काही हक्क, अधिकार प्राप्त झाले व काही कर्तव्य सुद्धा सांगण्यात आले. परंतु आज देशाची परिस्थिती पाहिली तर आपल्या असे लक्षात येईल की सर्वांना आपल्या अधिकारांचे स्मरण असते. आपल्या हक्कांसाठी ते उठाव करतात, लढा देतात, आंदोलन करतात. श्रमिकांच्या संघटना आहेत. कारखानदारांच्या ही आहेत.**

कर्मचाऱ्यांच्याही आहेत. काम करणारा प्रत्येक वर्ग कुठे ना कुठे संघटित होतो व आपल्या हक्कांवर बोलतो, हक्कांसाठी आंदोलन करण्याची तयारी त्याची असते. परंतु कर्तव्यांचे काय? संविधानाने आपल्याला आपले कर्तव्य सुद्धा सांगितलेले आहे. परंतु आम्ही कर्तव्यांकडे अगदी सरळसोट डोळेझाक करीत असतो. स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून मी माझ्या मिळकतीवरचा कर भरला पाहिजे हे माझे दायित्व आहे. परंतु आज आपल्या असे लक्षात येते की सर्वच लोक कर कसा चुकवता येईल याचाच प्रयत्न करीत असतात. त्याच्याच पळवाटा माहित करण्यासाठी मात्र ते पैसे खर्च करीत असतात. वाहतूक व्यवस्थित चालली पाहिजे यासाठी ठिकठिकाणी सिग्नल लावलेले असतात. परंतु जर पोलीस तिथे हजर नसेल तर त्या सिग्नलचे पालन करणारे फार थोडेच आपल्याला दिसतात. सर्वांनाच स्वच्छ आणि सुंदर शहर आवडत असते. परंतु ती स्वच्छता इतरांनी करावी अशी त्यांची अपेक्षा असते. म्हणजे कारमधून जात असताना, बसमधून जात असताना हातातील पुडका ते बाहेर फेकण्यास सदैव सज्ज असतात. सार्वजनिक ठिकाणी एखादी गोष्ट खाल्ल्यानंतर त्याचा कागद रस्त्यावरच फेकला जातो. भाजी बाजारातला कचरा हा रस्त्यावरच फेकला जातो. प्रत्येकाला त्याच्या घरचा कचरा समोरच्याच्या दाराशी टाकण्यामध्ये विशेष उत्सुकता असते. सार्वजनिक मालमत्ता ही थुंकण्यासाठी व कचरा फेकण्यासाठीच असते अशा पद्धतीचा समज सर्वत्र दिसून येतो. शहरातून वाहणारी नदी, शहरात असणारे तलाव हे सुद्धा कचरा फेकण्यासाठी व घाण करण्यासाठी असतात अशा पद्धतीच्या समज काही लोकांचा दिसून येतो.येथे थुंकू नये अश्या पाट्याच पिचकाऱ्यांनी रंगलेल्या असतात. सर्वांना स्वच्छता पाहिजे आहे. परंतु ती करणार कोण? अमलात कशी आणायची याच्यावर विचार करायला, वेळ द्यायला कोणालाही वेळ नाही असे दिसून येते. आपल्या घरातील लाईट थोडा वेळ सुरू राहिला तर एकमेकांच्या नावाने घरात आरडा ओरड होत असते. बिल जास्त येईल याची आठवण करून दिल्या जाते. परंतु रस्त्यावरील पथदिवे जर चुकून सुरू राहिले तर त्याची सूचना विद्युत विभागाला कोणीही करीत नाही. घरातील नळ ताबडतोब बंद व्हायलाच पाहिजे. परंतु सार्वजनिक नळ सुरू राहिला तर माझे काय बिघडते अशा पद्धतीची विचारसरणी लोकांची आपल्याला दिसून येते. ज्या ठिकाणी सिग्नल नाही अशा चौकांमध्ये रस्त्यावरून जाण्याचा अधिकार पहिले माझाच आहे अशा पद्धतीची भावना दिसून येते. त्यामुळे दर थोड्या थोड्या वेळाने अशा चौकांमध्ये वाहतूक थांबत असते व मोठ्या रांगा लागत असतात. सर्व लोकं सुज्ञ आहेत. वाहतुकीचे नियम सर्वांनाच माहिती आहे. तरीसुद्धा वाहतूक पोलिसांनी अडविल्यावर त्याला आपली ओळखी कोणाशी आहे हे सांगून सुटण्याकडे कल अधिक असतो. शिक्षण हे एक उदात्त कार्य होते. परंतु स्वातंत्र्यानंतर त्याचे बाजारीकरण झाले. शिक्षकाला गुरूचा दर्जा होता परंतु हल्ली तो राहिलेला नाही. तसेच वैद्यकीय व्यवसायाचे सुद्धा झाले.डॉक्टरांना लोक देव मानायचे परंतु तिथे मोठ्या प्रमाणावर बाजारीकरण झालेले दिसून येते. पेशंटकडे बळीचा बकरा म्हणून पाहण्याची मानसिकता दिसून येते. सरकारी बाबू तर काही खाल्ल्याशिवाय काम करायलाच तयार नसतात. विविध ठिकाणी सेवेच्या नावावर चालणाऱ्या विभागांमध्ये सेवा करण्याकडे कल कोणाचा राहिलेला नाही असे दिसून येत



असते. वकील सुद्धा केस लढवताना समोरच्या पक्षाशी काहीतरी आर्थिक लाभ घेऊन बांधील झालेला असतो. व तो आपल्याच अशिलाच्या विरोधात वेळकाढू पणाचे धोरण राबवितांना दिसतो. पोलीस, गुंड वकील यांचे संगनमत तर आपल्याला माहीतच आहे. रस्त्या रस्त्यावर सामान्य नागरिकांना थांबवून त्यांच्याकडून पैसे उकळणारे पोलीस आपल्याला नेहमीच दिसतात. त्याचप्रमाणे रस्त्याच्या कडेला थांबलेल्या ट्रक वाल्याकडून पैसे घेताना सुद्धा आपण अनेक वेळा पोलिसांना पाहत असतो. एखाद्या निर्दोष माणसावर खोटे गुन्हे दाखल करण्याच्या घटना सुद्धा घडत असतात. तर आरोपी ला मोकळे सोडण्यासाठी किंवा कमी त्रास होण्यासाठी गुन्ह्याचे कलम सुमार दर्जाचे लावण्यासाठी पैसे खाताना आपल्याला अनेक पोलीस अधिकारी दिसत असतात. अनेक कार्यालयांमध्ये महिलांना काम करण्यासाठी भयमुक्त वातावरण मिळत नाही. तिथेही त्यांना त्रास देण्याचे, त्यांच्या शोषणाचे प्रकार घडताना आपल्याला दिसत असतात. जी बाई लहान मुलांना घरामध्ये आईसारखे सांभाळायची तिला आया म्हटले जायचे.अशा आयांकडूनही मुलांना मारण्याचे, उपाशी ठेवण्याचे व काही ठिकाणी त्यांच्याकडून भीक मागून घेण्याचे प्रकार सुद्धा झालेले आहेत. सगळीकडे डोळेझाक सुरू आहे. बांधल्या जाणाऱ्या रस्त्याची गुणवत्ता खराब असेल तर त्याकडे सरकारचे, अधिकाऱ्यांचे व जनतेचे सुद्धा लक्ष नसते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे याकडे शिक्षक व पालक दोघांचीही डोळेझाक असते. विद्यार्थ्यांना सुद्धा कष्ट करून विद्या मिळवायची नसते. कोरोनाच्या काळामध्ये विद्यार्थी देव करो आणि आमची परीक्षा कोरोनामध्ये बुडो अशा पद्धतीची प्रार्थना करीत होते. कारखान्यामध्ये काम करणाऱ्या मजुरांना सुद्धा कोरोनाच्या निमित्ताने जेवढ्या अधिक सुट्ट्या मिळेल तेवढे चांगले, फक्त पगार मात्र पूर्ण मिळाला पाहिजे अशा पद्धतीची त्यांची अपेक्षा होती. प्रत्येकाला आपल्या घरापाशी सुंदर बगीचा असावा असे वाटते परंतु झाडे लावायला कोणीही तयार नाही. आपण सर्वांनी आता आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे.आपण प्रजासत्ताक राष्ट्र आहोत. विकसीत आणि शक्तिशाली होत आहोत. जगाने आमच्याकडे आदर्श राष्ट्र म्हणून बघावे यासाठी आम्हाला आमचा आळस झटकावा लागेल. नागरिक म्हणून चांगल्या सवयी आत्मसात कराव्या लागतील. कर वेळेवर भरावा लागेल. स्वच्छता हा स्वभाव बनवावा लागेल. सुरळीत वाहतुकीसाठी सहकार्य करावे लागेल. वृद्ध आणि अनाथ यांची जबाबदारी स्वीकारावी लागेल. कुटुंबांनी, शाळांनी आपली मूल्य शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.तरच आम्ही खरे खुरे प्रजासत्ताक राष्ट्र आहोत असे आम्ही म्हणू शकू.

# ज्याला अपयशाचंसुद्धा सोनं करता आलं तो दिग्गज ठरतो

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क 9011634301

वेळेवर आणि काळावर आजुन तरी कोणाचही नियंत्रण नियंत्रण प्रस्थापित झालेल नाही .हि सत्ता अजुनतरी एकहाती निसर्गाच्या ताब्यात आहे. निसर्गाने खुप मोठी शक्ति ताकद स्वतःकडे अबाधित ठेवली आहे. माणुस कितीही प्रभावी असला तरी वेळेवर आणि काळावर अजुन तरी नियंत्रण मिळवणं माणसाला शक्य झालं नाही . जीवनात अनेक वेळा आपल्या मनाविरुद्ध घडतं आणि अशा वेळी चालते ती निसर्गाची अनियंत्रित सत्ता .हि निसर्गाची अनियंत्रित सत्ता असली तरी आपल्यासाठी अघात असतो .पण हा निसर्गाचा आणि वेळेचा आघात आपण कधी कधी सहन करण्या पलीकडे असतो . अशावेळी खचणे हा पर्याय नसतोच मुळी म्हणून आपण खचुन न जाता स्वतःला घडवलं पाहिजे .वेळेशी संघर्ष केला पाहिजे . आणि वेळेसोबत आणि काळासोबत संघर्ष करत आपल्याला अपयशाच सोनं करता आलं पाहिजे . तेव्हा आपण दिग्गज ठरतो . वडिलोपार्जित कोणीही दिग्गज ठरत नाही . म्हणून जन्माला येताच कोणी दिग्गज म्हणून जन्म घेत नाही.अपयशाला यशात , अपकिर्तीला किर्ती मध्ये रूपांतर करत अपयशाचे सुद्ध सोन करता आलं पाहिजे. त्या शिवाय व्यक्ती मधील दिग्गज प्रकट होत नाही. यशाचं तर सोन कोणीही करेल त्यामध्ये फार असं कौतुकास्पद काही नाही .पण अपयशाच सुद्धा सोन करण एवढं सहज सोपं नसतं आणि ज्याला अपयशाच सोनं करता आलं तो वास्तविक दिग्गज असतो. म्हणून अपयशाच सुद्धा सोन करण्याची ताकद धमक आपल्या मध्ये असली पाहिजे.जीवन हा यश अपयशाचा लंपडाव असतो आणि हा लपंडाव वेळेनुसार काळानुसार बदलत असतो. वेळकाळ परस्थिती सारखीच आपल्या बाजूने राहिल असं होण कठिण असतं. कधी कधी वेळ काळ परस्थिती आपल्या विरोधात पण जाऊ शकते आणि मग अशावेळी आपल्या मध्ये असणारा दिग्गज प्रकट झाला पाहिजे. जीवनाशी संबंधित वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये ज्यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, उद्योग व्यवसाय, तसेच वेगवेगळ्या नोकरीच्या,रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या वेगवेगळ्या संधी जगाच्या पाठीवर किंवा देशभरात बऱ्यापैकी संधी उपलब्ध आहेत . संधी उपलब्ध नाहीत हि फक्त पोकळ चर्चा आहे . म्हणून उपलब्ध असणाऱ्या वेगवेगळ्या पातळीवरवरील वेगवेगळ्या व्यवसायाच्या नोकरीच्या रोजगाराच्या संधी ज्या उपलब्ध आहेत . त्या संधी च्या अनुषंगाने त्या पदाच्या अनुषंगाने किंवा व्यवसायांसाठी संधी मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करणं गरजेचं त्यासाठी प्रथम आपल्याला योग्य माहित असणे आवश्यक आहे.तसेच त्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता आपल्या कडे अर्जित असली पाहिजे आणि आपल्याकडे ती शैक्षणिक पात्रता



नसेल तर आपण ती अर्जित करणं अपेक्षित आहे. आपण तशी शैक्षणिक पात्रता अर्जित करू शकलो नाही तर मग मात्र आपण त्या ठिकाणी कमी पडतोय आशा आपण कमी पडल्यामुळे ती संधी आपल्या हातुन जाते. अशा वेळी येण केन प्रकारे जीवनातील कोणतीही संधी निसटली तर चिंता करू नका तणाव घेऊ नका चिंता करू नका कारण आपल्या मध्ये असणारा दिग्गज आपण प्रकट केला पाहिजे व आपल्याकडे असणारी प्रचंड विद्वत्ता गुणवत्ता आणि सयंम याचा योग्य सदुपयोग करून जी संधी आपल्याला मिळवायची आहे. पण त्या संधीने आपल्याला हुलकावणी दिली आहे. ती संधी सुद्धा आपण आपल्या संयमीत शक्ति ने प्राप्त करू शकतो आणि पात्रता गुणवत्ता आपण स्वतः मध्ये निर्माण केली पाहिजे. आपली चुकलेली संधी मिळवण्या मध्ये आपण कुठेही कमी पडणार नाही .याची दक्षता घेऊन संधीचा पाठलाघ केला पाहिजे. आणि या पद्धतीने जर आपण नियोजनबध्द रणनिती नुसार संधीचा पाठलाघ केला .तर अशक्य असे काहीच नाही. म्हणून संधी उपलब्ध नाही हा चर्चेचा विषय होऊ शकत नाही आणि वास्तविक सत्य नाही. कर्तबगार व्यक्ती कशातही संधी निर्माण करू शकतो आपण कुठे कमी पडतोय आणि आपल्या त्यामध्ये काय सुधारणा करता येईल तसेच आपल्याला हवी असणारी संधी तिथपर्यंत आपल्याला कशा पद्धतीने पोहोचता येईल.याच चिंतन करून संधी पुन्हा मिळवता येऊ शकते पण हा जो अपयशाचा कालावधी आहे तो आपल्याला आपल्या ज्ञान मार्गाने यशस्वी करत त्या मधुन स्वतःला दिग्गज घडवता आलं पाहिजे.

# देशाच्या विकासाला प्राधान्य द्यावे!

आधुनिक केसरी



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

२६ जानेवारी २०२३ रोजी सर्व भारतीय ७४वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. आपला भारत देश प्रचंड विविधतेने नटलेला आहे. आपल्या भारत देशाची राज्यघटना १९५० रोजी अमलात आली. तेव्हापासुन दरवर्षी प्रजासत्ताक दीन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. राज्यघटना ही आपल्या देशाचा आत्मा आहे. प्रजासत्ताक दिन व स्वातंत्रदीन हे सर्वात मोठे उत्सव आहेत. या दिवशी शाळा, कॉलेजमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. या दिवशी आपल्या देशाविषयी प्रेम ओथंबून येते. आपण भारत माझा देश आहे ही प्रतिज्ञा नेहमी म्हणतो. आपल्या देशाविषयी नक्कीच आपण अभिमान बाळगला पाहिजे. आपण भारतमातेचे गुणगान गायले पाहिजे. या दिवशी राजपथावर लष्करी संचलनाबरोबर प्रत्येक राज्यातील संस्कृतीचे व तेथील परंपरांचे चित्ररथाद्वारे पहावयाला मिळते. तसेच लष्करातील भूदल, नौदल व हवाईदल या तिन्ही दलाच्या सामर्थ्याचे दर्शन होत असते. देशाच्या सुरक्षेसाठी सज्ज असलेले रणगाडे,



हेलिकॉप्टर, क्षेपणास्त्रांचे संचलन दिमाखात पार पडते. हे पाहत असताना भारतीयांची छाती अभिमानाने फुलुन येते. आपण प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना आपण देशाच्या विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. आपण आर्थिक महासत्ता बनण्याकडे वाटचाल करत आहोत. सरकारने संरक्षणक्षेत्र, रस्ते वीज, पाणी, आरोग्य, स्वच्छ भारत, शिक्षण क्षेत्रात चांगले कामे झाली. दुसरीकडे आर्थिक मंदीचे सावट,वाढती महागाई, बेरोजगारी, या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. गोरगरीबांचे जीवनमान उंचावण्यासाठी अथक प्रयत्न गरजेचे आहे. सर्वसामान्य माणसांचे जीवनमान बदलले पाहिजे. आपल्या देशात युवा वर्गाची संख्या जास्त आहे त्यांना विधायक कार्यासाठी त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. ग्रामीण भागातील जनतेचा विकास कसा होईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. भारत महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. परंतु जोपर्यंत देशाचा सर्वांगीण विकास होत नाही. तोपर्यंत परीस्थीती जैसे थेच राहणार आजपर्यंत अनेक सरकार आली, गेली पण लोकांच्या जीवनमानात काही बदल झाला का प्रश्न आहे तसेच आहेत. त्यासाठी देशाच्या विकासाला प्राधान्य दिले पाहिजे.

# सुरुवात

आधुनिक केसरी

जेव्हा मला पुरेसा आत्मविश्वास आला तेव्हा स्टेजवर जाण्याची वेळच संपली.



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614

जेव्हा मला जिंकायची खात्रीच नव्हती तेव्हा मी जिंकून गेलो. जेव्हा मला माणसांची गरज होती तेव्हा सगळी माणसेच सोडून गेली. जेव्हा मला कुणाच्या खांद्यावर डोके ठेऊन रडायचे होते. तेव्हा कुणीतरी माझ्याच खांद्यावर डोकं ठेऊन रडत होतं. जेव्हा मी दुसऱ्याचा द्वेश करायला शिकलो तेव्हा मला माहीत पडलं की कुणीतरी माझ्यावर जीवापाड प्रेम करतंय. जेव्हा मी सुर्योदय होण्याची वाट पहात होतो तेव्हाच मला नेमकी झोप लागली आणि तेव्हाच सुर्य वर आला....... मित्रांनो, हेच तर जीवन असतं..! तुम्ही काय प्लान केलाय याच्याशी काही देणं घेणं नाही.. कारण परेश्वराने तुमच्यासाठी काहीतरी वेगळंच ठरवून ठेवलयं..! तुमचं यश तुमची ओळख जगाला करून देतं.. आणि तुमचं अपयश तुम्हाला जगाची ओळख करून देतं..! जेव्हा तुम्ही सगळ्या आशा गमावून बसता आणि आता सगळं संपलं असे म्हणता तेव्हा परमेश्वर हसून म्हणतो, अरे निराश नको होऊस संपलं काहीच नाही ही तर सुरूवात आहे. म्हणून मित्रांनो, जीवनात कधीच निराश होऊ नका. पुढे परमेश्वराने तुमच्यासाठी खुप चांगल्या गोष्टींची तजवीज करून ठेवलीयं. नेहमी आनंदी रहा..! नेहमी हसत खेळत रहा..!



# समुद्र

मावळतीला जाताना समुद्रात बुडणारा तांबडा
भडक सूर्य पाहताना देहभान विसरून जायला होतं
ते ठिकाण......समुद्र
सूर्य बुडल्यानंतरही त्याच्या नयन मनोहारी
प्रभां सोबत फेरफटका मारण्यासाठी आलेल्या
आकाशातील विविध आकारांच्या ढगांची जमा
होण्याची जागा .......... समुद्र
चंद्रासोबत फिरस्तीला आलेल्या आकाशातील
चांदण्या......... त्यांची मोजदाद करत अख्खी रात्र
घालवायची जागा ...... समुद्र
दूरवर पसरलेला निळाभोर शांत ...... अंगाखांद्यावर
पांढरी झाल पांघरलेला लाटांमधेच रमणारा
....... माणसांच्या जगापासून एकटा अलिप्त
राहणारा......... समुद्र
सुरूची उंच उंच झाडे, त्यांच्याशी हितगुज करणारी
नारळाची झाडं....... किनाऱ्यावर सोनेरी गालिचा
अंथरल्यासारखी मऊशार वाळू असणारा.......
समुद्र
मऊशार वाळूत अनवाणी चालतांना आपल्याच
पायांचे ठसे उमटलेले आणि ,विरघळलेले पाहायचं
ठिकाण...... समुद्र
सतत हसतमुख असणारा हसता कधी कधी रौद्र रूप
धारण करणारा........कधी चांगला तर कधी वाईट
तरीही स्वतःच्या खारेपणातही नाविन्याची गोडी
देणारा....... समुद्र
नेहमीच दुसऱ्यांच ऐकणारा, सगळ्यांना साथ देता
देता गाज आपली ऐकवणारा .......
ऐकता ऐकता कधीतरी मग स्वतःच रडणारा.......
समुद्र
इतरांच हसण - रडण,सुख-दुःख स्वतःच्या पोटात
दडवणारा
कोणी कितीही सांगितलं तरी पोटात गुपित ठेवणारा
........समुद्र
स्वप्नांत , जागेपणी आठवला तरी गाज
ऐकवणारा.......समुद्र ....समुद्र..... समुद्र आणि
समुद्र......



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

# 'हळदी-कुंकू'चा इव्हेंट जरुर असावा मात्र आपली संस्कृती, परंपरा जपून...!!

आधुनिक केसरी



राजू जाधव
मांगूर, जि.बेळगांव

आपल्या भारतीय संस्कृतीत आजही "हळदी-कुंकू" कार्यक्रमाला मानाचे स्थान आहे पण गेल्या काही दिवसापासून याला राजकीय वळण लागल्याचे दिसून येत आहे आजच्या महिला पुरुषांच्या बरोबरीने, खांद्याला-खांदा लावून सर्वच क्षेत्रांत वावरत आहेत हि स्वागतार्ह बाब आहे सद्या समाजामध्ये "हळदी कुंकू" ची क्रेझ वाढत असून सोबत सांस्कृतिक आणि विविध स्पर्धांचे आयोजन केल्याने महिलांच्या कलागुणांना वाव मिळत आहे पुर्वी मकर संक्रातीपासून ते रथ सप्तमी पर्यंत हळदी - कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जायचे या मागे एकच उद्देश असायचा स्नेह वृद्धिंगत व्हावा, या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व महिला एकत्रित येवून हा इव्हेंट मोठ्या उत्साहाने साजरा करावा, महिलांना आनंद द्विगुणित करता यावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध होवून प्रोत्साहन मिळावे मात्र कालांतराने या कार्यक्रमाचे स्वरुप बदलून नवरात्र असो अथवा धार्मिक कार्यक्रम किंवा छोट्या - छोट्या कार्यक्रमात देखिल अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जात असल्याने याला बाजारीकरणाचे स्वरुप प्राप्त झाल्याचे वास्तव नाकारता येत नाही अनेक राजकारणी लोक हाच मोका साधून आपल्या राजकीय कारकिर्दीसाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करुन फायदा घेत आहेत हळदी- कुंकूच्या नावाखाली महिलांना आकर्षक आणि किंमती वस्तू भेट म्हणून दिल्या जातात एरव्ही या महिलांना कोणीही विचारत नाही हेही तितकेच खरे आहे मात्र भारत सरकारने महिलांची उन्नती व्हावी या उद्देशाने महिला बचत गटांना प्रोत्साहन दिले आहे सद्या या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात हळदी - कुंकू कार्यक्रमांचे आयोजन केले जाते महिला बचत गटांचाही वापर मोठ्या प्रमाणात राजकीय नेते करुन घेत आहेत अशा प्रकारामुळे काहींची राजकीय गणिते बिघडली आहेत तर काहीजणांची सुधारली आहेत त्यामुळे इव्हेंट जरुर असावा मात्र आपल्या भारतीय संस्कृतीचे जतन करुन सद्या होत असलेल्या बाजारीकरणाला थांबवून सणांचे पावित्र्य जपले पाहिजे तरचं "हळदी - कुंकू " कार्यक्रमाचा उद्देश सफल होईल !

# मराठी असे आमुची मायबोली

आधुनिक केसरी

**पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी..**
**आपल्याच घरात हाल सोसते मराठी...**



सुजाता नवनाथ पुरी
संपर्क 8421426337

या ओळी आठवण्याच कारण म्हणजे हा पंधरवडा आपण मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा करीत आहोत....अनेक पर प्रांतीय लोकांचे लोंढे रोजगारासाठी महाराष्ट्रात येत आहेत.

ज्या प्रांतात तुम्हाला प्रतिष्ठा ,रोजीरोटी आणि बरच काही चांगलं मिळाल तेथील भाषेविषयी प्रेम तर दूरच पण कमाली चा द्वेष वाटावा यासारखं दुर्भाग्य ते कोणत..

खरं पहायला गेलं तर ,मराठी ही एक खूप सुंदर भाषा आहे जी मुख्यतः महाराष्ट्रात आणि थोड्या प्रमाणात गोव्यात बोलली जाते. ही भाषा भारतातील एकूण बावीस अधिकृत भाषा पैकी एक आहे,आणि विशेष म्हणजे भारतात सगळ्यात जास्त बोलली जाणारी चौथी भाषा म्हणजे मराठी होय. ह्या भाषेला दोन हजार वर्षांचे अस्तित्व असल्याने तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळायलाच हवा...पण राज्यकर्ते, प्रसार माध्यमे आणि एकूणच आपण सर्व च जनाची उदासीनता याला कारणीभूत आहे... एखादा माणूस दोन ओळी इंग्रजीतून बोलूद्या त्या माणसाला डोक्यावर उचलून घेतले जाते...काय तर म्हणे जगाची भाषा तीच आहे....

मग प्रश्न असा पडतो की..

ज्यांनी वर्षानुवर्षे आपले दोर कापले, त्यांना कसे म्हणावे आपले.

आपल्याला पारतंत्र्य देणाऱ्या लोकांच्या भाषेबद्दल इतकी आपुलकी का वाटावी हेच न सुटणार एक कोड आहे..

**माझ्या मराठीची गोडी मला वाटते अवीट, माझ्या मराठीचा छंद, मना नित्य मोहवित..** अशी ही सुंदर भाषा वास्तविक पाहता आपल्या भावना, संवेदना आणि सुखदुःखे आपल्या




मातृभाषेत च म्हणजे मराठीतच नेमक्या अचूक आणि प्रभावी शब्दात आपल्याला मांडता येतात..पण झालय काय ब्रिटिश तर देश सोडून गेले पण जाताना त्यांची भाषा मात्र इथ रोपवून गेले तेच झाड आता मराठी भाषेच्या वृक्षावर अतिक्रमण करतेय.. स्वतंत्र झालेल्या भारतात आपण एक नवीन इंडिया उभा केलाय की जो आपल्याच मातृभाषेच्या जीवावर उठलाय...

म्हणूनच बाहेरच्या लोकांनी मराठी बोलावी तिचा आदर करावा ही अपेक्षा ठेवण्या ऐवजी आपण अगोदर तिचा मान ठेवला पाहिजे...समृद्ध इतिहासाची परंपरा या भाषेला लाभलेली आहे... ज्ञानेश्वर, तुकाराम या महान संतांच्या अभंग गाणी मराठीचा साज वाढवला आहे.. अमृतात ही पैज जिंकणारी अशी ही बावनकशी भाषा म्हणूनच मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन ही आपली जबाबदारी आहे कारण दुसरे कोणी येऊन ही भाषा वाचवतील ही आशाच व्यर्थ आहे कारण..

**थोडा उजेड ज्याला मागावयास गेले,**
**तो सूर्य ही जरासा लाचार पाहिला मी.**
**पैशात भावनेचा व्यापार पाहिला मी...**
**अशीच आत्ता ची अवस्था आहे..**

मराठी असे आमची मायबोली, हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू...असे आपण म्हणण्याची वेळ असताना मात्र मराठी भाषा च जणू काही आपल्याला म्हणत आहे की, **कुणी न हेलावले,**
**कुणी न ढाळले आसू,**
**खरोखरी हुं दकाच माझा**
**भिकार होता...**

जपान हा देश दुसऱ्या महायुद्धानंतर रसातळाला गेलेला देश आज प्रगतिशील देश म्हणून ओळखला जातो पण तरी ही त्या देशातील शिक्षण हे त्यांच्याच मातृभाषेतून घेण्याची सक्ती तेथे आहे.. मग इंग्रजी भाषेमुळे च प्रगती होते हा भ्रम त्यांनी आपल्या कृतीतून खोटा केला की नाही. म्हणूनच आपल्या येथील अभ्यास क्रमाची आणि शिक्षण क्रमची मांडणी ही सुध्धा मातृभाषेतूनच हवी.

वेदना, भीती, अचानक येणार संकट यावेळी जी शब्द प्रथम तोंडी येतो तो मातृ भाषेतलाच असतो. बर आपण स्वप्न सुध्धा आपल्याच भाषेत पाहतो.. मग इंग्रजीचा इतका अट्टाहास का... हा प्रश्न पडतो. शिक्षणतज्ज्ञ असे सांगतात की लहान मुलांना मूलभूत संबोध हे मातृभाषेतचं जास्त चांगल्या प्रकारे समजतात... संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे.

**भाषा रक्षति, रक्षितः** म्हणजेच तुम्ही भाषेचे रक्षण करा, भाषा तुमचे रक्षण करील. म्हणूनच आज ही काही योद्धे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी लढताहेत.. त्यांचा लढा पाहून इतकेच म्हणावेसे वाटते की, **करू नका चिंता, एव्हढ्यात पराभवाची.. रणामधे लढणारे आहेत अजुन बाकी..**

# मोड आलेले चणे खाण्याचे फायदे

आधुनिक केसरी

मोड आलेले चणे खाण्यासाठी खूपच चविष्ट असतात पण त्यांना आपण पाण्यात भिजवून खाल्लेत तर त्याचे एवढे फायदे होतात कि तुम्ही त्याचा विचारही करू शकत नाही. आज आम्ही तुम्हाला मोड आलेल्या चण्याच्ये फायदे सांगणार आहोत. ज्याला जरासुद्धा आयुर्वेदाचे ज्ञान असेल त्याला खूप चांगल्या प्रकारे माहिती असेल कि मोड आलेले भिजलेले चणे शरीरासाठी किती निरोगी आहेत. तुमच्या माहिती साठी तुम्हाला सांगू इच्छितो कि हे चणे खाल्ल्याने बरेच आजार बरे होतात. कारण यात PROTEIN, ओलावा, कार्बोहाइड्रेट, आयर्न, कॅल्शिअम आणि विटामिन्स आढळून येतात. चणे कोणत्याही ड्रायफूट पेक्षा कमी नाहीयेत, जे लोक याचे सेवन करतात त्यांना खूप चांगल्या प्रकारे याचे फायदे माहित आहेत. मोड आलेल्या चन्या मध्ये मोठ्या प्रमाणावर व्हिटॅमिन सी असतं. ज्यामुळे केसांची वाढ चांगली होते. तसंच रक्त शुद्ध व्हायला मदत होते. फळं आणि भाज्यांमध्ये मिळतं त्यापेक्षा १०० पट जास्त एंजाईम तुम्हाला मोड आलेले चणे खाल्यामुळे मिळतं.

मोड आलेले चणे खाल्ल्यामुळे पचन संस्थाही चांगली होते. यामध्ये असलेल्या प्रोटीनमुळे शरीर चांगलं काम करतं. मोड आलेले चण्यांमुळे चेहऱ्यावरच्या सुरकुत्याही कमी होतात. चणे दुसर्या डाळींपेक्षा स्वस्त असतात आणि आरोग्यासाठी हि हे दुसर्या डाळींपेक्षा पोष्टिक आहार आहे. चणे शरीरास आजारांपासून लढण्याची क्षमता वाढवते. सोबतच हे बुद्धीस जलद आणि चेहऱ्याच सुंदर बनवतात. चण्याचे सर्वात जास्त फायदे त्यांना मोड आल्यानंतर खाल्ल्याने होतात. भिजलेले चणे बदामपेक्षा जास्त फायदे देतात. जेव्हा तुम्ही याचा वापर कराल तेव्हा तुम्ही स्वताहून याचा फायदा जाणून घ्याल. शरीरास सर्वात जास्त पौष्टिक तत्व चण्यांपासून मिळते. तुम्हाला सांगू इच्छितो कि चणे खाल्ल्याचा लाभ तेव्हा मिळतो जेव्हा हे काळे चणे मोड आलेले असतील. कारण या मोड आलेल्या चण्यात विटामिन्स आणि क्लोरोफिलसोबतच फास्फोरस हे मिनरल्स असतात. जर तुम्ही चान्यांचे सेवन करत नसाल तर तुम्ही एकदा महिनाभरासाठी याचे सेवन करा. रात्री झोपण्यापूर्वी चण्याची एक मुठ पाण्यात भिजायला टाकावी. त्यानंतर पहाटे उठल्यानंतर तुम्हाला त्याचे सेवन करायचे आहे. असा दिनक्रम पूर्ण एक महिनाभर करावा. मोड आलेलं कडधान्य म्हणजे कडधान्यांना अंकुर म्हणजेच मोड येतात. अंकुरलेल्या या कडधान्यांना म्हणजे बियांना काही तास पाण्यात भिजवल्यावरनंतर ही प्रक्रिया सुरू होते. हे कडधान्य योग्य तापमानाच्या संपर्कात आल्यानंतर म्हणजेच एक ते दोन दिवसांत त्याला मोड येऊ लागतात. मोड आलेल्या धान्यांमध्ये अनेक प्रकार आहेत. यामध्ये बीन्स, वाटाणे, हरभरा, मटकी, मगू यांचा समावेश असतो. ज्यामध्ये मसूर, हरभरा, मूग, सोयाबीन, सोयाबीन, राजमा आणि मटार यांचा समावेश करता येतो. ब्रोकोली, मुळा, मोहरीची हिरवी भाजी आणि मेथी स्प्राउट्स या पालेभाज्यांचाही तुम्ही समावेश करु शकता. मोड आलेल्या कडधान्यांमध्ये मका, तांदूळ, बकव्हीट, क्विनोआ, ओट्स आणि राजगिरा स्प्राउट्सला समाविष्ट करुन घेऊ शकता. शेंगदाणे, मुळ्याच्या बिया, भोपळा, तीळ आणि सूर्यफूलच्या बियांचाही समावेश होतो. वरील सर्व मोड आलेल्या कडधान्यांचे जवळपास सारखेच फायदे आहेत.



मधुमेह हा शरीरावरच परिणाम करणार एक गंभीर आजार म्हणून ओळखला जातो. यामुळे शरीरात इतर अनेक आजारांचा मार्ग खुला होतो. या आजारात एका ठराविक वयानंतर डॉक्टर संयम बाळगण्याचा सल्ला देतात. मधुमेहासाठी योग्य जीवनशैलीचे पालन करणे आवश्यक आहे. त्यासाठी पथ्य आणि सुदृढ आहार महत्वाचा आहे. नियमित आणि वेळेवर जेवणे, व्यायाम करणे याला महत्त्व देणे गेरजेचे असते. असे केले तरच या आजारावर मात करता येते. नियमित आणि संतुलित आहारामध्ये तुम्ही मोड आलेली कडधान्यांचा विचार करु शकता. ब्रोकोली स्प्राउट ही मधुमेहाला नियंत्रित ठेवण्यासाठी महत्वाची मानली जाते. टाइप 2 मधुमेह असलेल्या रुग्णांमध्ये ग्लुकोज नियंत्रण करण्यासाठी हा एक चांगला स्रोत आहे. ब्रोकोलीमुळे शरीरातील इंसुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारते. एका ठराविक वयानंतर वजन वाढण्याची चिंता करत असतो. दरम्यान, ही समस्या टाळण्यासाठी आहाराची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. त्यामुळे मोड आलेल्या कडधान्यांचा नाश्ता हे एक चांगले पाऊल ठरू शकते. मोड आलेल्या धान्यांमध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते. तसेच प्रथिने आणि जीवनसत्त्वांसारखी पोषक तत्वेही आढळतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी मोड आलेलं कडधान्य फायदेशीर ठरतात. त्यामुळे वजन कमी करण्याच्या वेळापत्रकात तुम्ही नियमित न्याहारी म्हणून मोड आलेल्या कडधान्यांचा वापर करा. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते, तुम्ही दिवसभर एनर्जेटिकक राहता, चेहऱ्याची चमक वाढते आणि वजनही नियंत्रणात राहते. कारण यामुळे शरीराला पोषकतत्वे मिळतात आणि भूक कमी लागते.

# आ. बंब महिला मंडळाच्यावतीने हळदी-कुंकवाचा कार्यक्रम

## विविध स्पर्धा व बक्षीसांची रेलचेल, मनीषा प्रशांत बंब, श्रुती निखील पिपाडा (बंब) व भाग्यश्री राठोड यांचे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथे मंगळवारी २४ जानेवारी ला  मकरसंक्रात निमीत्त हळदी/कुंकू तिळगुळ व वाण वाटपाचा कार्यक्रमआ. प्रशांत बंब महिला मंडळाच्यावतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गंगापूर खुलताबादचे आमदार प्रशांत बंब यांच्या सौभाग्यवती सौ. मनीषा बंब व कन्या श्रुती निखील पिपाडा (बंब), भाग्यश्री राठोड उपस्थित होत्या सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते  छत्रपती शिवाजी महाराजांच्या यांच्या पुतळ्याला  पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले व कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला उपस्थित महिलांसाठी उखाणे, तळ्यात मळ्यात, संगीत खुर्ची व इतर विविध स्पर्धा घेण्यात आल्या  या स्पर्धेमध्ये प्रथम,द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विजेत्या महिलांना प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते बक्षीस देण्यात आले. या वेळी उपस्थित महिलांना मनीषा प्रशांत बंब, श्रुती निखील पिपाडा व भाग्यश्री राठोड यांनी महिलांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन केले.

दरम्यान या कार्यक्रमाचे आयोजन सरपंच मीनाताई संजय पांडव व कल्पनाताई नारायण वाकळे यांनी केले होते. उपस्थित महिलांना वाण वाटप करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच मीनाताई संजय पांडव यांनी केले तर आभार कल्पनाताई नारायण वाकळे यांनी केले.




# मिल परिसरातील आत्मदहनाचा प्रयत्न; पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** चितोड रोड मिल परिसरातील राहत असलेल्या तुळसाबाईचा मळा या ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून नागरिक राहत आहेत, ते राहत असलेल्या घरांचा हक्काचा सातबारा मिळावा म्हणून धुळे जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त व भूमि अभिलेख कार्यालयाकडे सातत्याने मागणी लावून धरली होती, मात्र प्रशासनाने त्यांच्या या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने या नागरिकांनी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकार्यालयावर आत्मदहनाचा इशारा दिला होता. आज रोजी धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण झाल्यानंतर मिल परिसरातील नागरिकांनी धुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर येत घोषणाबाजी करत स्वतःच्या



अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी या आंदोलनकर्त्यांना अडवले व त्यांच्याकडील डिझेलच्या बाटल्या हिसकवन्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी यातील काही आंदोलकांनी स्वतःच्या अंगावर ज्वलनशील द्रव्य ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला यावेळी त्यांना पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेतले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे सर्व आंदोलन करताना धुळे शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आली आहे व यात कुठलीही हानी झाली नाही.

# बाप -लेकाच्या अंतर्गत वादामुळे परतुर तालुक्यातील शेतकरी विहिरींपासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** मा.एकनाथ संभाजीराव शिंदे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना जिल्हाधिकारी जालना यांच्या कार्यालयामार्फत दिनांक.२५ जानेवारी २०२३ परतुर रोजी निवेदन देऊन प्रकाश सोळंके पुढे म्हणाले की, तालुक्यातील पंचायत समिती २०१७ पासुन एम.आर.ई.जी.एस अंतर्गत या तालुक्यातील शेतकऱ्यांना विहिरी मिळात नाहीत विहिरी मिळत नाहीत विहिरी मिळण्यासाठी कारवाई करण्यात यावी म्हणून जालना जिल्ह्यातील तालुका परतुर पंचायत समिती २०१७ ते २०२३ या कालावधीत या भागातील शेतकरी एमआरईजीएस योजने पासून तब्बल सात वर्ष वंचित आहेत, कारण २०१७ ला परतुर पंचायत समिती अंतर्गत २ हजार विहिरी मंजूर झाल्या होत्या परंतु परतुर तालुक्यातील राजकीय पक्ष भारतीय जनता पार्टीच्या अंतर्गत वादामुळे २ हजार विहिरी मंजूर झाल्या होत्या परंतु त्या पैकी १२०० विहिरी रद्द करण्यात आल्या होत्या, फक्त ८०० विहिरी लाभार्थी शेतकऱ्यांना



मिळाल्या होत्या,तेव्हापासून आजपर्यंत परतूर पंचायत समिती एम.आर.ई.जी.एस योजनेअंतर्गत या भागातील शेतकऱ्यांना जवळपास ७ वर्षापासून वंचित आहे, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेले आहे अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारा अधिक दोषी असतो म्हणून परतुर तालुक्यातील शेतकरी जवळपास ७ वर्षापासून शेतकरी वंचित आहेत म्हणून शेतकऱ्यांना एम.आर.ई.जी. एस. योजनेअंतर्गत विहिरीचा लाभ मिळावा या भागातील शेतकऱ्यांची मागणी आहे त्या अनुषंगाने जनहितार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अपेक्षा आहे.जालना जिल्ह्यातील तालुका परतुर येथील पंचायत समिती परतुर अंतर्गत ९७ गावातील शेतकरी विहिरीच्या लाभापासून वंचित असल्यामुळे त्यांना विहीर मिळण्यासाठी तत्काळ कारवाई करण्यात यावी तसेच या भागातील शेतकऱ्यांना गोरगरीब डीआरडी खालच्या शेतकऱ्यांना वेठीस धरून ७ सात वर्षापासून धडकच्या विहिरी नाहीत माननीय मुख्यमंत्री यांनी हस्तक्षेप करून मुख्य कार्यकारी अधिकारी जालना जिल्हा परिषद यांना आदेश देऊन नवीन धडकच्या विहिरी मिळण्यासाठी कारवाई करण्यात यावी अशी अशी ही मागणी शेवटी सोळंके यांनी निवेदनात म्हटले आहे

# अनिस रामपुरे प्रेस फोटोग्राफर यांना मुंबईत इंडियाज प्राईड पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने मुंबई अंधेरी मायूर हॉल येथे सोमवारी 23 जानेवारी रोजी प्रेस फोटोग्राफ़र अनिस रामपुरे यांना मान्यवरांच्या हस्ते सम्मानित करण्यात आले आहे. गेल्या 8 वर्षा पासुन वुर्ता पत्रात फोटोग्राफ़र पदावर काम केले आहे अनिसरामपुरे यांना पत्रकारीता क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी इंडियाज प्राईड आवार्डाने सम्मानित करण्यात आले निवृत्त जज सीएल थूल, समाजसेवक तरूण राठी,लेख तथा दिग्दर्शक विकास कपुर, अभिनेता किरण माने,नगरसेवक मोहसिन हैदर,अभिनेता कमल घिमीने,साहयक पोलिस आयुक्त संजय पाटील,डॉ शकील शेख,सिंगर पुजा चोपडा,आदींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे. शम ए रहेबर के संपादक ज़मिर कादरी, एशिया एक्सप्रेस के संपादक शारेक नक्शबन्दी,इरबाज़ अंसारी, मोबिन शेख, सय्यद अतहर ,सय्यद साबेर,साजीद मौलाना,आरिफ़ देशमुख,अहेमद चाउस, आदिल खान, अब्दुल सत्तार, मोहम्मद आदिल, जुबेर खान,अब्दुल हमिद,मोहम्मद जावेद, रफ़त खान, राहत खान, अब्दुल रेहमान आदींने शुभेच्छा दिल्या आहे.









# प्रजासत्ताकदिनी स्वातंत्र्यवीरांना, शहीदांना नमन करा - राष्ट्रप्रेम, बंधुभाव, एकात्मता, अखंडतेचे बीज पेरा



मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र.: ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी

**आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळाले. हे सहजा सहजी शक्य झाले का ? नाही ! नाही !! नाही !!! इंग्रजांनी भारतावर दिडशे वर्ष राज्य केले. भारतीय हे या परकियांच्या तावडीत, गुलामगिरीचे जीवन कुंठत होते. या पारतंत्र्याच्या जोखंडातून भारतीयांना मुक्ती मिळविण्यासाठी अनेक क्रांतीकारकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. आपल्याच मायभुमीत हिन प्रकारची वागणुक, दडपशाही किती दिवस सहन करायची या प्रखर विचाराने देश अभिमानाने शेकडो क्रांतीकारक ब्रिटीश राजवटी विरुध्द पेटून उठले. त्यांनी तन-मन-धनाने व्यापक लढा दिला. अनेक वीरांनी आपले आयुष्य देशासाठी समर्पित केले. भगतसिंग, राजगुरु, सुखदेव हे हसत हसत गीत गात फासावर गेले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी तर आझाद हिंद सेनेची स्थापना करुन इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले. यानंतर इंग्रजांना या देशातून चालतेच व्हावे लागले. हे कधीही विसरता कामा नये. तेंव्हा कुठे १५ ऑगस्ट १९४७, स्वातंत्र्यदिन व २६ जानेवारी १९५० हा प्रजाकसत्ताक दिन भारतीयांना पहावयास मिळाला. स्वातंत्र्य तर मिळाले पुढे काय ? विविध धर्म, भाषा, संस्कृती, एकाधिकार शाही, असमान अधिकार, कायदा व सर्वसामान्य नागरीकांच्या अशा अकांक्षांना कुठेलेही स्थान नसणारी एक राजकीय व्यवस्था स्वातंत्र्यपूर्व काळात नांदत होती.**

या देशातील नागरीकांना एक नागरीक म्हणून घेण्याचा समानधिकारी नव्हता. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, न्याय या मुल्यांचा विसर पडलेल्या भारतीय समाजाला हीच मुल्ये राज्यघटनेच्या रुपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुर्नःस्थापित केली. एव्हाना खऱ्या अर्थाने घटना, संविधानरुपी प्रजाकसत्ताक दिन अस्तित्वात आला. आज मोठया आनंदाने उत्साहाने प्रजाकसत्ताक दिन साजरा होत आहे. परंतु प्रजाकसत्ताक दिनाचे खरे महत्व काय याचा अनेकांना विसर पडतोय. देशातील प्रत्येक नागरीकाला सजक, जागरुक, दक्ष बनविण्यासाठी विज्ञाननिष्ठ संविधाननिष्ठ नागरीक बनविणे हे उद्दिष्ट शिक्षण व्यवस्थेचे पाहिजे. हम सब भारतीय है, हमारा देश भारत है, हे दररोज प्राथनेत म्हणतो, प्रजाकसत्ताक दिनीही, शाळा-शाळांत, झेंड्याला वंदन करत आपण हे म्हणतो. परंतु प्रत्यक्षात आचरणात आणले जाते का ? या उलट आज तर भारतीय माणूस म्हणून भारतीय नागरीकांची ओळख होण्या ऐवजी भारतीय माणून धर्माच्या नावाने ओळखला जात आहे. सत्ताधारी नेते व विरोधी नेतेही सत्तेसाठी हापापलेली आहेत. राजे, महाराजे यांच्या नावापुढे धर्मवीर म्हणून प्रचार केला जात आहे. एकीकडे अजान नको तर दुसरीकडे हनुमान चालीसा असा विषारी प्रचार होतोय कशासाठी ? याद्वारे कट्टर धर्मवाद, जातीवाद वाढवायचा आहे काय ? अशाने बंधुभावना, एकात्मता जोपासली जाणार आहे का ? अजुनही स्त्रियांना काही मंदिरात, तिर्थक्षेत्रात प्रवेश बंदी केली जाते कशासाठी ? एकीकडे आधुनिकतेचे, स्पर्धेचे, विज्ञानाचे युग म्हणायचे, स्मार्ट डिजिटल भारत, ग्लोबल भारत, सक्षम भारत या घोषणा दिल्या जातात. विकास प्रकल्पांची, कामाची कंत्राटे राजकीय नेते आपल्याच नात्यातील कंत्राटदारांना देऊन या योजनेतून लाखो रुपये हे दिवसा ढवळया हडप करत आहे. स्वतःच्या नावाखाली हा मनमानीपणाचा भ्रष्टाचार वाढतच आहे. पाश्चात्य संस्कृतिच्या नावाखाली मनाला वाटेल तसे वागून स्त्री व पुरुष यांचा स्वैराचार वाढला आहे. यातूनच तरुण, युवा पिढी नको त्या विकृतीच्या मार्गाला भरकटत जात आहे. यामुळे विद्यार्थी, तरुण युवा पिढीचे फार मोठे नुकसान होत आहे. हे कुठे तरी थांबले पाहिजे. यापासून आपण परावृत्त झालो पाहिजे, याला स्वातंत्र्य, प्रजाकसत्ताक म्हणता येईल काय ? अनेक वीरांनी, क्रांतीकारांनी स्वातंत्र्य मिळवून दिले. या स्वातंत्रवीरांना, शहिदांना नमन केले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खुप मेहनतीने, कष्टाने या देशासाठी राज्यघटना निर्माण केली. देशाला एकसंघ ठेवून २६ जानेवारी १९५० प्रजाकसत्ताक दिन अस्तित्वात आणला. हा प्रजाकसत्ताक दिन, हे स्वातंत्र्य अबाधित एकसंघ ठेवण्याचे तुमचे, आमचे सर्वांचे व सरकारचे आद्य कर्तव्य म्हणावे लागेल. शत्रू राष्ट्रा पासून आजही देशाला धोका आहे. अजुनही दहशतवादीच्या धमक्या अधुन मधुन भारतातील नेत्यांना येतच असतात, हे पण विसरता कामा नये. चीनच्या कुरापती चालुच आहेत. पाकिस्थानही मुग गिळून आहे. पण केंव्हाही ही दोन्ही शत्रू राष्ट्रे भारता विरोधी नको ती गरळ ओकून लचके तोडण्यास मागे पुढे पाहणार नाही. अखंडतेला, एकात्मतेला धोका निर्माण झालेला आहे. करीता सर्व भारतीय जनमताने प्रजाकसत्ताक दिनी एकच शपथ घ्या, प्रजाकसत्ताकदिनी स्वातंत्र्यवीरांना, शहीदांना नमन करा, राष्ट्रप्रेम, बंधुभाव, एकात्मता, अखंडतेचे बीज पेरा.



# तीन हजार तांड्यांवर बंजारा समाजाचे धर्मांतर

## सर्वांना पुन्हा हिंदू धर्मात आणणार : पू. बाबूसिंगजी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** अ. भा.हिंदू गोर बंजारा व लबाना नायकडा समाज कुंभाची आज २५ जानेवारी पासून सुरुवात झाली. यावेळी व्यासपीठावर पू. संत बाबूंसिंग महाराज (मुख्य गादीपती पोहरागड), मा. शरदराव ढोले अ. भा. धर्म जागरण प्रमुख, पू. महामंडलेश्वर गुरू शरणानंद महाराज, पू. संत गोपाल चैतन्य महाराज, संत सुरेश महाराज, संत देनाभगतजी महाराज, संत यशवंत महाराज, संत जितेंद्रनाथ महाराज, आचार्य साहेबराव शास्त्री, महंत संग्रामसिंग महाराज, संत रायसिंग महाराज आदी संत व्यासपीठावर उपस्थित होते. आठ राज्यात ११ हजार तांड्यावर प्रत्यक्ष संपर्क केल्यावर असे लक्षात आले की ३ हजार तांड्यावर ख्रिस्ती मिशनरीकडून बंजारा बांधवांचे धर्मांतर झाले आहे. त्या सर्व बांधवांना पुन्हा सनातन हिंदू धर्मात परत आणणार आहोत. हिंदू गोर बंजारा व लबाना नायकडा समाज जागृत करण्यासाठी व समाजाला दिशा देण्यासाठी कुंभ आयोजित असल्याचे पू. संत बाबूसिंगजी महाराज यांनी सांगितले. धर्म सभेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर असलेल्या श्री बालाजी भगवान, गुरुनानक देवजी साहेब, भारत माता आणि संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरवात झाली. यावेळी अ.भा. धर्मजागरण चे प्रमुख शरदराव ढोले यांनी मार्गदर्शन करतांना देशाचे वैभव पाहून परकीय आक्रमणे झाली. ज्या ग्रीकांनी आक्रमण केले होते ते हिंदू झाले. इस्लामचे आक्रमण वेगळे होते. ते क्रूर होते तलवारीच्या जोरावर लाखो लोकांचे धर्मांतरण त्यांनी केले. इसाई द्वारा छल , कपट आणि सेवेच्या माध्यमातून धर्मांतरण सुरु झाले. हे धर्मांतरण पूजा पद्धती पुरते मर्यादित न राहता वेगळे राज्य आणि वेगळा देशाच्या मागणीने सुरु झाले. पूर्वांचल मध्ये ७ पैकी ४ राज्यांमध्ये ख्रिस्तीकरण झाले. ११ हजार बंजारा तांड्यापैकी ३ हजार तांड्यांचे धर्मांतरण झाले आहे. बंजारा समाजाचे धर्मांतरण होऊ नये यासाठी तसेच धर्मांतरण थांबविण्यासाठी शेकडो संत येथे आले असल्याचे त्यांनी सांगितले. संत गोपाळ चैतन्य महाराज यांनी आपल्या आशीर्वचन करताना कुंभात सर्व महापुरुषांना आमंत्रित केले आहे. संत समाज धर्म रक्षणाचे काम करतो. ३ हजार गावात धर्म परिवर्तन झाले आहे म्हणून कुंभाची गरज पडली आहे. हिंदू समाजात जागृती होण्यासाठी आणि धर्म रक्षणासाठी हा कुंभ आहे असे सांगितले. संत बाबूसिंग महाराज यांनी आपल्या मार्गदर्शनात बंजारा समाजाच्या कुंभात मथुरेहून संत उपस्थित राहिले आहेत. कर्नाटक , महाराष्ट्र , गुजरात आदी राज्यातील समाज आणि संत कुंभात सहभागी झाले आहेत. गोर बंजारा व लबाना नायकडा समाजात महान संत घडून गेले आहेत. समाज संघटित होण्यासाठी हा कुंभ आहे. भक्ती मार्गातून दिशा मिळते. समाजाला जागृत करण्यासाठी संत व्यासपिठावर उपस्थित झाले आहेत. बंजारा समाजाचा प्रथम कुंभ गोद्री येथे होत असून हा ऐतिहासिक व अविस्मरणीय क्षण असल्याचे त्यांनी सांगितले. संत सुरेश महाराज यांनी आपल्या मार्गदर्शनात भारत मातेला आपण माता म्हणतो. आम्ही सनातनी आहोत आणि सनातनी राहू. सीमेवर सैनिक देश आणि भारत मातेच्या संरक्षणासाठी उभा असतो तर धर्मासाठी संत समाजात उभे असतात असे त्यांनी सांगितले. तर पू. महामंडलेश्वर शरणानंद महाराज यांनी प्रतिपादन करतांना बंजारा समाज हा व्यापक आहे. हा समाज व्यापारी होता. बंजारा समाज देशभर पसरलेला असून धार्मिक आहे. संत हाथिराम बाबा हे तिरुपती बालाजी यांच्या सोबत चौकट खेळत असत त्यामुळे बालाजी भगवान आणि हातीराम बाबा आपले श्रद्धास्थान आहेत असे सांगत त्यांनी उपस्थितांन आध्यात्मिक मार्गदर्शन केले.



# राष्ट्रीय मतदार दिवस हा लोकशाहीच्या जागराचा सोहळा : फ.मु. शिंदे

## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारताची लोकशाही राज्यघटनेवर आधारीत असून लोकशाहीत मतदार हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने मतदार दिन हा लोकशाहीच्या जागराचा सोहळा असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ मराठी साहित्यिक फ.मु.शिंदे यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या सभागृहात नवमतदारांचा सन्मान तसेच मतदार नोंदणीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या मतदार नोंदणी अधिकारी, समाजिक संस्था, महाविद्यालयींन विद्यार्थी तसेच विविध स्पर्धेचे पारितोषिक वितरण आज संपन्न झाले.

या कार्यक्रमास, अपर जिल्हाधिकारी डॉ. अनंत गव्हाणे, उपजिल्हाधिकारी भारत कदम, अंजली धानोरकर, उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक उमेश नागदिवे, उपविभागीय अधिकारी जर्नादन विधाते, डॉ.स्वप्नील मोरे, तहसिलदार संजय वरकड, शितल राजपुत यांच्यासह विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. लोकशाहीमध्ये समानता, हक्क आणि कर्तव्य हे नागरिकांना घटनेने बहाल केलेले असून यांचा वापर लोकशाही टिकवण्यासाठी केला पाहिजे. मतदार दिनानिमित्त काव्यमय, आणि विनोदी शैलीत विविध उदाहरणावरुन फ.मु.शिंदे यांनी मतदारांनाही मागदर्शन केले. डॉ. अनंत गव्हाणे यांनी लोकशाहीचे महत्व अबाधित राहण्यासाठी मतदारांनी मतदानांचा हक्क बजावावा याच उद्देशाने हा मतदार दिन उत्सवाचा असून लोकशाहीला बळकटी देणारा आहे. भारतीय स्वातंत्र्य हे आपल्या राज्यघटनेमुळे अबाधित राहिले आहे. तरुणांनी जबाबदारीने व जागरुकतेने मतदान करुन लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी सहकार्य करावे. असे आवाहन अपर जिल्हाधिकारी डॉ. अनंत गव्हाणे यांनी केले. उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक उमेश नागदिवे यांनी प्रत्येक महाविद्यालयात निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती दिली.यातून महाविद्यालयात युवकांमध्ये एकसंघ भावना निर्माण करण्याबरोबरच मतदानास प्रेरित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही सांगितले. निवडणूक विभाग उपजिल्हाधिकारी भारत कदम यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त प्रास्ताविक करुन विविध स्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांने सजकतेने तसेच जबाबदारीने मतदान केल्यास लोकशाही व्यवस्थेला पाठबळ मिळते असे सांगितले. याबरोबरच प्रत्येकाने मतदान करुन आपले कर्तव्य निभावले पाहिजे. यावेळी उपस्थितींना मतदान करण्याबाबतची शपथ देण्यात आली. महिला मतदांराची नोंदणी करण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या मानसी झोंड पाटील यांच्यासह एम.जी.एम महाविद्यालयाचे श्रीकांत मापारी यांना आधार प्रमाणीकीकरणात उत्कृष्ट काम केल्याबद्दल सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट निवडणूक वार्तांकन बाबत पत्रकार विजय चौधरी दै.महाराष्ट टाइम्स, नवनाथ ईधाते दै.सकाळ, नावीद शेख यांच्यासह तृतीय पंथीयाची मतदार नोंदणी करणारे अल्ताफ शेख तसेच विविध महाद्यिालयात घेण्यात आलेल्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये कला महाविद्यालय बिडकीन- रांगोळी स्पर्धा, डॉ. रफिक झकेरिया महाविद्यालय – पोस्टर स्पर्धा, सरस्वती भुवन महाविद्यालय- पथनाट्य यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.



# सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय प्रादेशिक भाषांमध्ये; प्रजासत्ताक दिनापासून सेवा सुरू

## सरन्यायाधीश चंद्रचूड यांची घोषणा


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय विविध भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये देण्याची सेवा सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी बुधवारी सुरू केली. गुरुवारी, प्रजासत्ताक दिनापासून हे निकाल प्रादेशिक भाषांत मिळण्यास सुरुवात होईल.
आज खंडपीठाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी वकिलांना सांगितले, की सर्वोच्च न्यायालय 'इलेक्ट्रॉनिक सर्वोच्च न्यायालय अहवाल' (ई-एससीआर) प्रकल्पाचा एक भाग म्हणून अनुसूचित भारतीय भाषांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे उपलब्ध करून देण्याची विनामूल्य सेवा गुरुवारपासून कार्यान्वित करेल. 'ई-एससीआर' प्रकल्पात सध्या सुमारे ३४ हजार निर्णय उपलब्ध आहेत. हे नेमके निकाल शोधण्याचीही सुविधा यात आहे. यापैकी प्रादेशिक भाषांत एक हजार ९१ निवाडे उपलब्ध आहेत. ते उद्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सार्वजनिकरित्या उपलब्ध करून देण्यात येतील. आमच्याकडे उडिया भाषेत २१, मराठीमध्ये १४, आसामीमध्ये चार, कन्नडमध्ये १७, मल्याळममध्ये २९, नेपाळीमध्ये तीन, पंजाबीमध्ये चार, तामिळमध्ये ५२, तेलुगूमध्ये २८ व उर्दूत तीन निकाल उपलब्ध आहेत, असे सांगून सरन्यायाधीश म्हणाले, की सर्वोच्च न्यायालयाकडून सर्व अनुसूचित भाषांत निकाल उपलब्ध करून देण्याची मोहीम राबवण्यात येत आहे. आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, उडिया, पंजाबी, संस्कृत, सिंधी, तमिळ, तेलगू,



उर्दू, बोडो, संथाली, मैथिली आणि डोगरी यांसह राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये २२ भाषा समाविष्ट आहेत.
'ई-एससीआर' प्रकल्पाचा भाग म्हणून हे निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर, त्याच्या मोबाइल ॲपवर व नॅशनल ज्युडिशियल डेटा ग्रिड (एनजेडीसी) च्या 'जजमेंट पोर्टल'वर उपलब्ध आहेत. सर्वोच्च न्यायालयाने, २ जानेवारीला वकील, कायद्याचे विद्यार्थी आणि सामान्य जनतेला ३४ हजार निकाल पाहण्याची विनामूल्य सेवा प्रदान करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक सर्वोच्च न्यायालय अहवाल (ई-एससीआर) प्रकल्प सुरू करण्याची घोषणा केली होती. देशभरातील वकिलांसाठी ही सेवा मोफत उपलब्ध आहे. वापरकर्त्यांना सोयीची शोध सुविधा आहे, असे सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले.

## गोध्रा दंगलीतील हत्येप्रकरणी २२ जणांची मुक्तता; गुजरात सत्र न्यायालयाचा निर्णय



आधुनिक केसरी न्यूज

**गोध्रा :** गोध्रा हत्याकांडानंतर २००२ मध्ये झालेल्या जातीय दंगलीत दोन मुलांसह अल्पसंख्याक समुदायाच्या १७ जणांच्या हत्येप्रकरणी २२ जणांची पुराव्याअभावी मुक्तता केली. गुजरातच्या पंचमहाल जिल्ह्यातील हलोल शहरातील सत्र न्यायालयाने हा निर्णय दिला. पीडितांची २८ फेब्रुवारी २००२ रोजी हत्या करण्यात आली होती व पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यांचे मृतदेह जाळल्याचा आरोप होता. अतिरिक्त सत्र न्यायाधीश हर्ष त्रिवेदी यांच्या न्यायालयाने मंगळवारी सर्व २२ आरोपींची पुराव्याअभावी मुक्तता केली. त्यापैकी आठ जणांचा खटला प्रलंबित असताना मृत्यू झाला, असे बचाव पक्षाचे वकील गोपालसिंह सोलंकी यांनी सांगितले. सोलंकी म्हणाले, की पंचमहाल जिल्ह्यातील देलोल गावात दोन मुलांसह अल्पसंख्याक समुदायाच्या १७ जणांची दंगलीत हत्या केल्याप्रकरणी न्यायालयाने सर्व आरोपींना पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले. फिर्यादी आरोपींविरुद्ध पुरेसे पुरावे गोळा करू शकले नाहीत व काही साक्षीदारही उलटले. पीडितांचे मृतदेह कधीही सापडले नाहीत. पोलिसांनी नदीच्या काठावरील एका निर्जन ठिकाणाहून अस्थी ताब्यात घेतल्या होत्या. परंतु त्या इतक्या जळाल्या होत्या, की पीडितांची ओळख पटू शकली नाही. देलोल गावात झालेल्या हिंसाचारानंतर हत्या व दंगलीशी संबंधित फौजदारी दंड संहितेच्या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आणखी एका पोलीस निरीक्षकाने या घटनेच्या सुमारे दोन वर्षांनंतर पुन्हा गुन्हा दाखल केला व दंगलीत सहभागी असल्याच्या आरोपाखाली २२ जणांना अटक केली होती.



## फेब्रुवारीत होणार खाशाबा कुस्ती स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कुस्ती मैदानासाठी सुशोभीकरण व नियोजनाची तयारी साठी पालकमंत्री गिरीश महाजन, खासदार सुभाष भामरे, जिल्हाधिकारी जलद शर्मा, पालिका आयुक्त, राजवर्धन कदमबांडे व इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गरुड मैदान येथे होणाऱ्या खाशाबा कुस्ती स्पर्धा साठी कित्येक वेळ चर्चा रंगली या चर्चेत पालकमंत्री गिरीश महाजन यांनी मोठ्या उत्साहात या मैदानाच्या सुशोभीकरणासाठी पुढाकार घेतला आहे व येणाऱ्या कुस्ती स्पर्धांसाठी फेब्रुवारीच्या 11 तारखेपासून धुळ्यातील सर्वात मोठी कुस्ती स्पर्धा राहील असे सांगण्यात आले या ठिकाणी उपस्थित पालकमंत्री गिरीश महाजन, खासदार सुभाष भामरे,जिल्हाधिकारी जलद शर्मा,सहाय्यक जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, पालिका आयुक्त देविदास टेकाळे, माजी महापौर प्रदीप कर्पे, उपमहापौर नागसेन बोरसे, नगरसेवक सुनील बैसाणे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## बॉलिंग करताना गोलंदाज जागेवरच कोसळला

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** नाशिकमध्ये आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत खेळत असताना 32 वर्षे युवकाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना नाशिक शहरात घडली आहे. गंगापूर रोडवरील एनबीटी महाविद्यालयात ही घटना घडली आहे. या महाविद्यालयात क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुरू असताना अचानक एका खेळाडूला चक्कर आल्याने तो मैदानात कोसळला. त्याला तातडीने उपचारासाठी खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.



## महिलांनी वाचनाची गोडी लावावी : सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरालगत मक्रणपुर येथील प्रज्ञाशोध सार्वजनिक वाचनालय येथे प्रजासत्ताक दिना निमित्त ध्वजारोहन नंतर ग्रंथपाल श्रीमती सुवर्णा औटे यांनी महिला साठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या वेळी कन्नड तहसीलच्या निवासी नायब तहसीलदार मोनाली सोनवणे यांची प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थीती होती. ललीता जाधव , संध्या जाधव, सृष्टी लोंढे ,सिध्दी लोंढे ,वैष्णवी लोंढे, अनुष्का थेटे, दिपाली ठोंबरे ,निकिता थेटे, भुमि भोसले इत्यादींनी भारतमाता, मोर, ताजमहल, रोकेट, फुले, वनसप्ती अश्या वेगवेगळ्या रांगोळ्या काढण्यात आल्या सर्व रांगोळ्या मधुन प्रथम, द्वितीय ,तृतीय बक्षीस काढुन विजेतेला बक्षीस नायब तहसीलदार मोनाली सोनावणे यांच्या हस्ते देण्यात आले या वेळी बोलतांनी म्हणाल्या आता स्पधैचे युग आहे महीला व युवतीनी रोजच्या चालना -या घडामोडीवर अचुक लक्ष ठेवावे व वाचनाची गोडी लावावी प्रज्ञाशोध सार्वजनिक वाचनालयात येऊन विविध पुस्तकाचे वाचन करावे घडणाऱ्या घडामोडी वर अचुक लक्ष ठेवावे. या वेळी प्रज्ञाशोध सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल श्रीमती सुवर्णा औटे यांनी नायब तहसीलदार श्रीमती मोनाली सोनवणे यांचे शाल देऊन स्वागत केले या वेळी मंदा पाटोळे, माया जाधव, लक्ष्मी वळेकर ,मिनाक्षी जाधव ,सुरेखा भोसले, द्वारकाबाई लोंढे, शकुंतलाबाई लोंढे, ज्योती मालोदे, मिराबाई मालोदे, मोनाली पवार, वेदिका पाटील, गायत्री हुळहुळे, मंदा मोरे इत्यादींची उपस्थीती होती .

## करडई, सुर्यफुलाचे पिके नामशेष होण्याच्या मार्गावर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** आठ ते दहा वर्षांपासून रब्बी हंगामात गहू, ज्वारी आणि हरभरा पिकाला शेतकऱ्यांनी अधिक पसंती दिली आहे. त्यामुळे रब्बी हंगामातून तेल वर्गीय असलेले जवस, कारळे, अंबाडी, हुलगे, करडई व सूर्यफुलाचे पीक जवळपास इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे. सोयगाव तालुक्यात यंदा करडईचे क्षेत्र शून्य टक्के असून सुर्यफूलाचे प्रमाणही अत्यंत कमी झाले आहे.
शासनाने तेलबिया उत्पादन व प्रक्रिया उद्योगात असलेली संधी विचारात घेऊन खाद्यतेल धोरणाला अनुसरून काही वर्षांपासून पावले उचलली आहेत. मात्र, शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याचे दिसत आहे. तेल वर्गीय पिकाचे नामशेष होणारे क्षेत्र जगवण्यासाठी शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटपाचा कार्यक्रम राबवून लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन करण्याची गरज व्यक्त होत आहे. खरीप हंगामात सोयाबीन वगळता तेल वर्गीय पिकांच्या लागवडीचे प्रमाण दोन टक्केच होते. आता रब्बी हंगामात घेतल्या जाणाऱ्या तेल वर्गीय पिकांचे प्रमाणही अत्यंत कमी दिसत आहे. बाजारात मागणी असलेल्या सुर्यफूल व करडईचे क्षेत्र तर शून्य टक्क्यावर आल्याचे दिसत आहे. पूर्वी रब्बी हंगामात ज्वारीसोबत करडई पीक प्रामुख्याने घेतले जात होते. शेतकरी खरिपासह रब्बी हंगामात सुर्यफूलाचे पीक घेत होते. मात्र, आता करडई व सुर्यफूल ही पिके घेण्याकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. एवढेच नव्हे तर काही वर्षांपासून जवसाचे पीकही दिसत नाही. कारळे, अंबाडी,



हुलगे, ताग ही पिके जवळपास इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहेत. विविध कारणांमुळे क्षेत्र घटले पूर्वी करडई फायदेशीर पीक समजले जायचे . अवेळी पाऊस, विविध रोगांचा प्रादुर्भाव तसेच सूर्यफूल व करडईला कमी दर ही लागवड क्षेत्र घटण्याची प्रमुख कारणे आहेत. शेतकरी अधिक फायदा मिळणाऱ्या ज्वारी, गहू, सोयाबीन, हरभरा पिकांकडे वळले आहेत.

करडईचे क्षेत्र पूर्वी आहारात करडईचे तेल वापरणे प्रतिष्ठेचे व आरोग्यवर्धक मानले जात होते . परंतु, सद्य :स्थितीत करडई दुर्मिळ झाली आहे . त्यातच करडई पीक घेतल्यास त्याच्या काढणीस मनुष्यबळाअभावी अडचण येत आहे . याशिवाय करडईच्या परिपक्वतेचा कालावधी ज्वारी, हरभऱ्यापेक्षा जास्त आहे . यामुळे शेतकऱ्यांनी या पिकाकडे पाठ फिरवली आहे . **वरदानसिंग ठाकूर, शेतकरी तथा ग्रामपंचायत सदस्य, नादांतांडा, ता . सोयगाव**